❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शनिवार, दि. ०८ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २२४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रुपये
www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारितेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनेलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

संध्या प्रहार




# कर्जमुक्ती योजनेच्या लाभ वितरणास प्रारंभ

## प्रत्येक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील ६.२२ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम जमा

- अमरावती विभागात १ लाख ५८ हजार १४६ शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात १,३७२.१७ कोटींचा लाभ
- नाशिक विभाग- १ लाख ४० हजार ८९ शेतकऱ्यांना १,२०९.३९ कोटी रुपये
- छत्रपती संभाजीनगर विभाग- १ लाख ३० हजार ९३४ शेतकऱ्यांना ९३२.६१ कोटी रुपये
- पुणे विभाग- १ लाख ४ हजार ६१ शेतकऱ्यांना ८६०.९७ कोटी रुपये
- नागपूर विभाग- ७० हजार २९० शेतकऱ्यांना ५४४.७१ कोटी रुपये
- कोकण विभागातील १८ हजार ६८७ शेतकऱ्यांना १०८.८६ कोटी रुपयांचा लाभ



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळणार असून, शेतकरी सक्षम, शेती समृद्ध आणि महाराष्ट्र अधिक प्रगत करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, योजनेच्या पहिल्या टप्प्यात ६.२२ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन हस्तांतरित करण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे तसेच सहकार आयुक्त दीपक तावरे उपस्थित होते. तसेच सर्व पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि सहकारी संस्थांचे निबंधक दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पहिल्या टप्प्यात आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ६.२२ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम थेट जमा करण्यात आली आहे. राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आवश्यक आर्थिक बळ मिळेल. ही योजना पूर्णपणे ऑनलाइन असून, शेतकऱ्यांना कुठेही अर्ज करण्याची आवश्यकता नाही. योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून, ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच संबंधित बँक शाखांमध्येही प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील प्रत्येक शेतकऱ्याला एक विशिष्ट क्रमांक देण्यात आला आहे. हा क्रमांक घेऊन शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर ॲग्रीस्टॅकवरील नोंदणी करून आधार प्रमाणीकरण करावे. एवढीच सहज आणि सोपी प्रक्रिया असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

ज्या जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या अडचणी अथवा प्रलंबित बाबी असतील, त्या संबंधित पालकमंत्र्यांनी निदर्शनास आणुन द्यावे त्या सर्व विषयांवर मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये सविस्तर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल. अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

या योजनेतील कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता या घटकांच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १२ राष्ट्रीयकृत बँका आणि इतर खासगी बँकांसह एकूण ५३ बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. विविध बँकांकडून सुमारे ३२ लाख कर्जखात्यांचा डेटा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आला असून, ६ ऑगस्ट २०२६ अखेर १२.१० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्याची माहिती सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

## थोडक्यात...

### मिसिंग लिंक अपघातावर नार्वेकर यांचा संताप

पुणे : दैनिक संध्या

पुणे-मुंबई एक्सप्रेसवेवरील मिसिंग लिंकच्या बोगद्यात शुक्रवारी पहाटे एक अत्यंत भयंकर अपघात घडला. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव एसयूव्ही कारने एका मिनी ट्रकला मागून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत कारचा चक्काचूर झाला असून पिंपरी-चिंचवडमधील युवा काँग्रेस कार्यकर्ते तुषार भूमकर यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत अन्य ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. महामार्ग सुरक्षा पथकाचे अधीक्षक शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात शुक्रवारी पहाटे १:२० वाजण्याच्या सुमारास मिसिंग लिंकवरील बोगद्याच्या आत घडला. कार अतिशय वेगात असल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ती समोर चाललेल्या मिनी ट्रकला जाऊन धडकली. धडक इतकी जोरदार होती की कारच्या पुढील भागाचा पार चक्काचूर झाला. पोलिसांनी याप्रकरणी बेदरकारपणे गाडी चालवणाऱ्या कार चालकाला तत्काळ ताब्यात घेऊन अटक केली आहे.

### इंड्युकेअर फार्माचा परवाना कायमचा रद्द

पुणे : दैनिक संध्या

आयुर्वेदिक औषधांच्या उत्पादनात गंभीर नियमभंग आणि निकृष्ट दर्जाची औषधे तयार केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुणे जिल्ह्यातील जेजुरी एमआयडीसी येथील इंड्युकेअर फार्मा प्रा. लि., जेजुरी एमआयडीसी या कंपनीचा आयुर्वेदिक औषध उत्पादन परवाना कायमस्वरूपी रद्द केला आहे. कंपनीने तयार केलेली सहा औषधे शासकीय विश्लेषकांनी निकृष्ट दर्जाची घोषित केल्यानंतर ही कठोर कारवाई करण्यात आली. एफडीएने कंपनीची दोन वेळा तपासणी केली असता औषधे व प्रसाधने कायद्याचे आणि गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेसच्या नियमांचे गंभीर उल्लंघन झाल्याचे आढळले. नियमानुसार औषध निर्मितीचे पुरावे नसणे, बॅच मॅन्युफॅक्चरिंग रेकॉर्ड अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. तसेच कच्च्या मालाच्या गुणवत्तेच्या चाचण्या न करणे, प्रयोगशाळेतील आवश्यक सुविधा नसल्याचे समोर आले. याशिवाय उत्पादन विभागात अस्वच्छता, यंत्रसामग्रीची नोंद नसणे, तापमान व आर्द्रता नियंत्रणाची व्यवस्था नसणे, तसेच औषधांच्या विक्रीची नोंद उपलब्ध नसल्याचे तपासणीत उघड झाले.

### तरुणीची बिअर शॉपच्या मालकाला विक्री

पुणे : दैनिक संध्या

परदेशात चांगल्या नोकरीचे स्वप्न दाखवून एका तरुण महिला उमेदवाराची फसवणूक करत तिची युरोपमध्ये मानवी तस्करी आणि लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नागपूर येथील २८ वर्षीय महिलेला पोर्तुगालमध्ये सुपरमार्केटमध्ये नोकरी देण्याचे आमिष दाखवून तब्बल ११ लाख रुपयांना गंडवण्यात आले आणि तिची पोर्तुगालमधील एका बिअर शॉपच्या मालकाला विक्री करण्यात आली. यातून सुटका करून घेत ही महिला भारतात परतली असून, तिच्या तक्रारीवरून पुणे पोलिसांनी या फसवणूक रॅकेटविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार महिला डिसेंबर २०२५ मध्ये परदेशात नोकरी शोधत असताना तिला इंस्टाग्रामवर वी मायग्रेट नावाच्या मायग्रेशन कन्सल्टन्सीची माहिती मिळाली. या संस्थेचे कार्यालय पुण्यातील विमान नगर परिसरातील फिनिक्स मार्केटसिटीमध्ये होते. या एजन्सीने सोशल मीडियावर परदेशी वर्क व्हिसा मिळालेल्या उमेदवारांचे आनंद साजरा करतानाचे व्हिडिओ अपलोड केले होते.

## गौरी-गणपतीसाठी कोकणात एसटीच्या ५,२२० जादा बसेस धावणार : मंत्री प्रताप सरनाईक


■ मुंबई (दै. संध्या)



श्री गणरायाचे आगमन १४ सप्टेंबर रोजी होत असून, बाप्पाच्या स्वागतासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) सज्ज झाले आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि परिसरातील कोकणवासीयांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या गणेशोत्सवानिमित्त एसटी महामंडळाने यंदा ७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत ५,२२० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. गणेशोत्सवाच्या जादा वाहतुकीच्या नियोजनासंदर्भात एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच एसटीचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले, "गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या भावविश्वाशी घट्ट जोडलेला सण आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही नफा-तोट्याचा विचार न करता कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सज्ज आहे. यंदा सुमारे ५,२२० जादा बसेस कोकणातील विविध मार्गांवर धावणार आहेत." या जादा बसेसचे आरक्षण npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रवाशांना बसस्थानकांवर तसेच MSRTC Bus Reservation या अधिकृत मोबाईल ॲपद्वारेही आरक्षण करता येणार आहे. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, नुकत्याच पार पडलेल्या आषाढी एकादशी यात्रेसाठी एसटी महामंडळाने ५,२०० जादा बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. त्या सेवेला भाविक व प्रवाशांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्याच धर्तीवर गणेशोत्सवासाठीही मोठ्या प्रमाणावर जादा बसेस उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. किमान ४० प्रवाशांच्या गटासाठी १० ऑगस्टपासून गट आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गट आरक्षणामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के भाडे सवलत लागू राहणार आहे. गणेशोत्सवानिमित्त ७ सप्टेंबरपासून मुंबई, ठाणे आणि पालघर विभागातील प्रमुख बसस्थानकांतून या जादा बसेसचे संचालन करण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय शैक्षणिक केंद्र नाशिकमध्ये उभारणार : मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)



भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देत नाशिकला देशातील अग्रगण्य शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. केंद्रीय संस्कृत विद्यापीठाच्या नाशिक परिसरामुळे संस्कृत, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या शिक्षणाला नवी दिशा मिळणार असून, हा प्रकल्प राज्याच्या शैक्षणिक विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, दिल्लीच्या प्रस्तावित नाशिक परिसरासाठी आरक्षित करण्यात आलेल्या १६.८० हेक्टर (सुमारे ४१.५१ एकर) जमिनीचा ७/१२ उतारा विद्यापीठाच्या प्रतिनिधींना सुपूर्द करण्यात आला. यावेळी केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. आर. जी. मुरलीकृष्ण, मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश इंदापवार, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम,नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताची प्राचीन ज्ञानपरंपरा आणि आधुनिक संशोधन यांचा समन्वय साधणाऱ्या शैक्षणिक संस्थांची आज देशाला गरज आहे. केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचा नाशिक परिसर हा याच संकल्पनेचे मूर्त रूप ठरेल. या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना संस्कृतसह आधुनिक तंत्रज्ञानाच्या अभ्यासाची संधी उपलब्ध होईल, तसेच संशोधन आणि नवोपक्रमाला चालना मिळेल.

ते म्हणाले की, नाशिकला धार्मिक आणि सांस्कृतिक नगरी म्हणून देशभरात वेगळी ओळख आहे. आता या प्रकल्पामुळे नाशिकची ओळख उच्च शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या राष्ट्रीय केंद्र म्हणूनही निर्माण होईल. राज्य शासन या प्रकल्पासाठी आवश्यक सर्व सहकार्य देत असून, विद्यापीठाच्या उभारणीची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. नाशिक जिल्ह्यातील शिलापूर गावात प्रस्तावित नाशिक रिंगरोडलगत ही जमीन असून, ७/१२ उतारा हस्तांतरित झाल्यामुळे संबंधित जमिनीचे अभिलेख विद्यापीठाच्या नावे वर्ग झाले आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या केंद्रीय संस्कृत विद्यापीठाने नाशिक येथे अत्याधुनिक, बहुविद्याशाखीय शैक्षणिक परिसर उभारण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ४०० कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला असून, तो केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

## तिसऱ्या मुंबईच्या विकासाला अधिक गती मिळणार

■ एमएमआरडीए आणि टेमासेक सुरबाना जुरोंग व मॅपलट्री, सिंगापूर यांच्यात सामंजस्य करार

■ रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये १०० एकरांचा जागतिक दर्जाचा मिश्र-वापर विकास प्रकल्प

■ मॅपलट्रीकडून १.१ अब्ज डॉलरपेक्षा अधिक FDI अपेक्षित; सुरबाना ज्युरॉंगची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती


■ मुंबई ३.० साठी ३२४ चौ.कि.मी. क्षेत्राचा एकात्मिक मास्टर प्लॅन

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) आणि त्यापलीकडील परिसर हा देशाच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र बनण्याची क्षमता असलेला प्रदेश आहे. नीती आयोगाने मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासातून सुमारे १.५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता व्यक्त केली आहे. या क्षमतेचा प्रभावी उपयोग करून मुंबई महानगर प्रदेशाचा नियोजित, शाश्वत आणि जागतिक दर्जाचा विकास करण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत भागीदारी करण्यास सुरुवात केली आहे. यातून तिसऱ्या मुंबईच्या विकासाला अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला. सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत एमएमआरडीए आणि टेमासेक सुरबाना जुरोंग व मॅपलट्री, सिंगापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त तथा रायगड-पेन ग्रोथ सेंटरचे अध्यक्ष पी.वेलारसू, टेमासेकचे अध्यक्ष पियुष गुप्ता, टेमासेक पोर्टफोलिओ विकास प्रमुख (आशिया ऑपरेशन्स) दिनेश खन्ना, सुरबाना जुरोंगचे प्रमुख अविनाश मिश्रा, मॅपलट्रीचे वरिष्ठ उपाध्यक्ष अजय कुमार सिंग, रायगड-पेन ग्रोथ सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव मित्तल, रायगड-पेन ग्रोथ सेंटरचे संचालक के. व्ही. ब्रह्माजी राव व संबंधित यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या भागीदारीचे स्वागत करताना सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू आणि मुंबई महानगर प्रदेशातील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे रायगड परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळत आहे.

### रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये १०० एकरांचा विकास प्रकल्प

रायगड पेण ग्रोथ सेंटर लिमिटेड आणि मॅपलट्री यांच्यात १०० एकरांच्या मिश्र-वापर विकास प्रकल्पासाठी सामंजस्य करार करण्यात आले. या प्रकल्पामध्ये मॅपलट्रीकडून विकासासाठी आवश्यक भांडवली व कार्यकारी भांडवल गुंतवणूक, मूल्यनिर्मिती, देश-विदेशातील गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या व्यवहारातून रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये १.१ अब्ज अमेरिकन डॉलरपेक्षा अधिक परकीय थेट गुंतवणूक येण्याची अपेक्षा आहे. यामुळे परिसरातील औद्योगिक, व्यावसायिक आणि नागरी विकासाला मोठी चालना मिळणार आहे. रायगड पेण ग्रोथ सेंटर लिमिटेडने सुरबाना ज्युरॉंग यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचा करार केला आहे. सुरबाना ज्युरॉंगने यापूर्वीच रायगड-पेण ग्रोथ सेंटरसाठी व्हिजन प्लॅन, मास्टर प्लॅन आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्लॅन तयार केला आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यात संस्थेचा अनुभव महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कंत्राटदाराकडून करण्यात येणाऱ्या कामांचे परीक्षण व मंजुरी, डिझाईन, अभियांत्रिकी आराखडे, रेखाचित्रे, कागदपत्रे आणि अन्य कामांचे परीक्षण करण्याची जबाबदारी सुरबाना ज्युरॉंग पार पाडणार आहे. तसेच बांधकामाची गुणवत्ता, कामाची प्रगती, करारातील अटींचे पालन, कामाच्या प्रगतीचे व टप्प्यांचे प्रमाणन, कामगिरीचे निरीक्षण आणि आवश्यक सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करण्याचे कामही सुरबाना ज्युरॉंग करणार आहे.



या पार्श्वभूमीवर रायगड-पेण ग्रोथ सेंटर आणि 'थर्ड मुंबई' अर्थात मुंबई 3.0 च्या विकासासाठी सिंगापूरमधील नामांकित संस्था आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसोबत करण्यात आलेले करार महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासासाठी शासनाने आखलेले नियोजन आता प्रत्यक्षात येत आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे प्रत्यक्ष सुरू झाल्यामुळे देश-विदेशातील गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावरील विश्वास वाढत आहे.

सिंगापूरला शहरी नियोजन, पायाभूत सुविधा आणि जागतिक दर्जाची शहरे विकसित करण्याचा मोठा अनुभव आहे.



## सुषमा स्वराज या प्रतिभावंत राजकारणी

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना 'अग्निशिखा सुषमा स्वराज' या हिंदी अनुवादित पुस्तकाची पहिली प्रत भेट देण्यात आली. डॉ. मेधा सोमय्या यांनी मूळ मराठीत लिहिलेल्या या पुस्तकाचा हिंदी अनुवाद अमरजीत मिश्र यांनी केला आहे. सुषमा स्वराज या अष्टपैलू प्रतिभावंत राजकारणी होत्या. आपल्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत भूषविलेल्या प्रत्येक पदावर त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला होता, असे उद्गार राज्यपालांनी याप्रसंगी काढले. सुषमा स्वराज या अमोघ वक्त्या होत्या. उत्कृष्ट संसदपटू होत्या. लढवय्या विरोधी पक्ष नेत्या आणि कार्यक्षम मंत्री होत्या. आज समाजाला त्यांच्यासारख्या समकालीन आदर्श व्यक्तिमत्वाची (रोल मॉडेल) गरज आहे असे राज्यपालांनी सांगितले. स्वराज यांनी केलेले संस्कृत मधील एक भाषण इतके अस्खलित आणि विद्वत्ता प्रचुर होते की संस्कृतच्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी ते ऐकावे. आपण विद्यापीठांना सुषमा स्वराज यांचे ते भाषण संस्कृत विद्यार्थ्यांसाठी ऐकण्यास उपलब्ध करण्याची शिफारस करु असेही त्यांनी सांगितले.

# संपादकीय

**तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच.**

सध्या बहुचर्चित असलेल्या 'जेन झी'च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना

## जेथे जाऊ तेथे...

महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंढेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात.

भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो.

मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डावं-उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप-परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंढे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे.

ती सहसा बातम्यांत येत नाही. सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेंसारखा नि:स्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नांवाचा योग साधून त्यांना थेट 'आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजां'ची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिकाऱ्याच्या वाटेला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल.

मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. तिथे असलेल्या अधिकारांचा उपयोग करून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. मुंबईतल्या जुन्या, प्रसिद्ध ब्रँडना टाळी ठोकल्याने, मोठमोठ्या-मातब्बर क्लबना नियम भंगांच्या आरोपाखाली खेचल्याने, अनेक सरकारी-न्यायालयीन इमारतींतील उपाहारगृहांनाही कायद्याचा बडगा दाखवल्याने अनेक प्रतिष्ठितांचे धाबे दणाणले आहेत. शाळांच्या आवारात आणि शाळांच्या आवारापासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात 'जंक फुड'ला बंदी केल्याने मुंढे आता मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रडारवर आले असतील. 'जेथे जाऊ तेथे देऊ खळबळ उडवून' या बाण्याने मुंढेंचं काम सुरू असलं, तरी त्यामुळे प्रशासनाच्या वरिष्ठ वर्तुळात नेहमीच नाराजी असते. राज्यातले बाकी सगळे अधिकारी तडजोडी आणि दबावाखाली सहज झुकणारे असून मुंढे तेवढे नि:स्पृह, निर्भय आणि निष्पक्ष असल्याचं चित्र निर्माण होतं, असा या वर्तुळाचा आक्षेप असतो.

## संस्कृत सुभाषित

सदा लोकहिते युक्ता: रत्नदीपा इवोत्तमा: ॥

अर्थ : लोककल्याणात रममाण झालेले लोक रत्नाच्या दिव्याप्रमाणे कशाचीच अपेक्षा धरत नाहीत, तर ते दुसऱ्यासाठीच तेवत असतात.

## गुरु वचन

### दृढ संकल्पात सर्व शक्य

आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक असे विकासाचे चार प्रकार आहेत. निरंतर आध्यात्मिकतेकडे अग्रेसर राहण्यातच मानव-जीवनाची सार्थकता आहे. यासाठी मानवी मनोवृत्तीचे निर्मलीकरण व दिव्यीकरण आवश्यक आहे. सतत उपासनेमुळेच हे शक्य आहे. उपासनामुळे आत्मबळ मिळते. दैवी दयाचा अनुभव उपासनानेच होतो. उपासनाचे २ प्रकार मानले गेले आहेत -वैधी तथा नामरूप स्मरणात्मक. वैधी उपासना दुष्कर आहे. ती जटील विधि-विधानांच्या मालिकेत अडकली आहे. याउलट नामरूप स्मरणात्मक उपासना कुठलीही औपचारिकताची अपेक्षा किंवा नियम-उपनियमाने बांधिल नाही. याद्वारे सुख व दु:ख, दोन्ही एकरुप होण्याची शक्ती मिळते, हृदय शांत होते, मनाला आराम मिळतो, बुद्धीचे तेज वाढते व अंत:करण स्वच्छ होते. नामस्मरणाने साधक सौरमंडळ भेदून ब्रह्मांडाचा अधिकारी बनतो म्हणून कबीर म्हणतात की, जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत निर्भय होऊन ईश्वराचे नामस्मरण करत राहिले पाहिजे. तेलाप्रमाणे आयुष्य संपल्यावर शरीर रूपी ज्योत विझते. साधना व साध्य दोन वेगवेगळ्या वस्तू नाहीत. त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. एकाच्या अभावात दुसरे मिळू शकत नाही. लक्ष्य विदित झाल्यावरच साधनाचे स्वरूप निर्धारित होऊ शकते. शास्त्र सांगते की, जर तुम्हाला देवत्व मिळाले तर पुन्हा या जगात येऊ शकणार नाही. जिज्ञासुच्या रुपात आपली बुद्धीमत्ता यातच आहे की, प्रथम सर्व इंद्रियांना मनात निरुद्ध करावे, मनाल ज्ञान-स्वरूप बुद्धीत विलीन करावे, ज्ञानस्वरूप बुद्धीला महान आत्म्यात विलीन करावे व यास शांत स्वरूप परमात्म्यात विलीन करावे. दृढ संकल्पानेच हे शक्य आहे. जेव्हा संकल्प दृढ असतो, ईश्वर चरणी अखंड विश्वास असतो तेव्हा उद्देश साध्य होतो. संकल्प शुद्धी व दृढतेने ईश्वरास सुद्धा तासनतास नाचवले आहे. वास्तवात दृढ संकल्प एका गडाप्रमाणे आहे, जो भयंकर प्रलोभनांपासून आपणास वाचवतो.

## उपदेशकथा

### व्यवहारबुद्धी

एका गावामध्ये दृढ मैत्री असलेले चार ब्राह्मण पूत्र राहात होते. त्यापैकी तिघांनी शास्त्राची खूप घोकंपट्टी केली. पत्रव्यवहार, बुद्धी त्यांना अजिबात नव्हती. चौथा बुद्धिमान होता. त्याने कुठल्याच शास्त्राचा अभ्यास नुसत्या घोकंपट्टीने केला नव्हता. ते चौघे एकदा द्रव्य मिळविण्याच्या इच्छेने राजाकडे निघाले. वाटेत एका अरण्यात त्यांना सिंहाची हाडे दिसली. त्यापैकी एकाने हाडे गोळा करून सिंहाचा सांगाडा विद्येच्या सामर्थ्याने बनविला. दुसऱ्याने आपल्या विद्येने त्यात रक्त, मांस, कातडे घातले व तिसरा त्यात जीव ओतणार तोच बुद्धिमान असा चौथा म्हणाला, अरे थांब, हा सिंह जिवंत झाला तर आपणा सर्वांना खाऊन टाकील. त्यावर तिसरा म्हणाला, मूर्खा माझी विद्या मी अशी फुकट जाऊ देणार नाही. बुद्धिमान म्हणाला, मग थांब मी झाडावर चढतो मग त्यात जीव ओत. त्याप्रमाणे तो झाडावर चढल्याबरोबर तिसऱ्याने त्यात जीव ओतला. जिवंत झाल्याबरोबर सिंहाने डरकाळी फोडून तिघांनाही ठार केले. सिंह निघून गेल्यानंतर चौथा सावकाशपणे झाडावरून खाली उतरला.

कथा उपदेश : शास्त्राचा वापर व्यवहारबुद्धीने करावा.

## पंचांग

| पंचांग | नक्षत्र:रोहिणी १६:५०:५९ |
|---|---|
| ८ ऑगस्ट २०२६ | योग:ध्रुव ०९:०१:२३ |
| शनिवार | योग:व्याघात |
| विक्रम संवत्- २०८२ | २९:३७:३३+ |
| आषाढ शके | करण:विष्टि १३:५९:३२ |
| संवत्- १९४८ | करण:बव २४:३४:०५+ |
| संवत्सर -पराभवनाम | सूर्य:कर्क |
| अयन- दक्षिणयन | चन्द्र:वृषभ |
| मास- आषाढ | हिजरी सन् - १४४८ |
| ऋतु- सौर वर्षा | मुस्लिम मास - सफर |
| कृष्ण पक्ष | तारीख - २४ |
| तिथि:दशमी १३:५९:३२ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 7 | 1 | 8 | | | 2 | | 6 |
| | | | | | 1 | | | 3 |
| 2 | | 6 | | | | | 9 | |
| | | 8 | 3 | 7 | | 4 | | |
| 7 | | 4 | | 6 | | 1 | | 8 |
| | | 3 | | 1 | 8 | 9 | | |
| | 3 | | | | | 7 | | 9 |
| 6 | | | 2 | | | | | |
| 1 | | 7 | | | 4 | 6 | 8 | 2 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०३३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 9 | 8 | 5 | 2 | 4 | 3 | 1 |
| 5 | 4 | 3 | 1 | 9 | 7 | 8 | 6 | 2 |
| 2 | 1 | 8 | 6 | 4 | 3 | 7 | 9 | 5 |
| 9 | 3 | 4 | 5 | 7 | 6 | 2 | 1 | 8 |
| 8 | 6 | 5 | 2 | 1 | 9 | 3 | 7 | 4 |
| 1 | 2 | 7 | 4 | 3 | 8 | 9 | 5 | 6 |
| 7 | 5 | 1 | 3 | 8 | 4 | 6 | 2 | 9 |
| 4 | 9 | 6 | 7 | 2 | 1 | 5 | 8 | 3 |
| 3 | 8 | 2 | 9 | 6 | 5 | 1 | 4 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७८६ - जॉक बाल्मात व मिशेल-गॅब्रियेल पकार्डनी युरोपमधील सर्वोच्च शिखर मॉँत ब्लांकवर सर्वप्रथम सफल चढाई केली.
- १८६३ - गेटिसबर्गच्या लढाईत हार पत्करल्यावर दक्षिणेच्या सेनापती रॉबर्ट ई. लीने राजीनामा दिला (जो अस्वीकृत झाला).
- १९१८ - पहिले महायुद्ध-अमियेन्सची लढाई - दोस्त राष्ट्रांची जर्मनीविरुद्ध आगेकूच.
- १९४२ - दुसरे महायुद्ध - अमेरिकेत ६ जर्मन व्यक्तींना हेर असल्याच्या आरोपाखाली मृत्युदंड.

### राष्ट्रीय

- १५०९ - सम्राट कृष्णदेवरायचा राज्याभिषेक व विजयनगर साम्राज्याची स्थापना.
- १९६३ - कामराज योजना जाहीर. कॉँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी मंत्रिपदाचे राजीनामे दिले.

### जन्म

- १०७९ - होरिकावा, जपानी सम्राट.
- १८७५ - आर्तुर दा सिल्वा बर्नार्देस, ब्राझिलचा राष्ट्राध्यक्ष.
- १८७९ - एमिलियो झपाता, मेक्सिकन क्रांतीकारी.
- १८८० - अर्ल पेज, ऑस्ट्रेलियाचा ११वा पंतप्रधान.
- १८८९ - जॅक रायडर, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९०९ - बिल व्होस, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ८६९ - लोथार, लोथारिंजियाचा राजा.
- १९८८ - हिराबाई बडोदेकर, ख्यातनाम गायिका.
- २००४ - सन्मित्र कार स.पा. जोशी, 'सन्मित्र' हे ठाणे जिल्ह्यातील पहिले वृत्तपत्र त्यांनी सुरू केले.

## : SMS :

Wife: 1 baar "I love you" bolo na
Husband: Kal bola tha
Wife: Wo kal ki expiry ho gayi, aaj wala naya chahiye

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.१ | २३.६ |
| अहमदनगर | ३१.२ | २३.१ |
| अकोला | ३५.५ | २६.३ |
| अमरावती | ३५.८ | २५.९ |
| बीड | ३८.४ | २९.९ |
| भंडारा | ३७.१ | २७.२ |
| बुलढाणा | ३४.९ | २७.३ |
| चंद्रपूर | ३९.१ | ३० |
| चेन्नई | ३८.६ | ३१.१ |
| नवी दिल्ली | ३५.५ | २७.९ |
| धुळे | ३६ | २५.६ |
| गोंदिया | ३७.४ | २६.५ |
| जळगाव | ३५.५ | २५.७ |
| कोल्हापूर | २६.८ | २३ |
| लातूर | ३०.९ | २३.८ |
| मुंबई | ३४.५ | ३०.२ |
| नागपूर | ३८.१ | २७.४ |
| नांदेड | ३४.७ | २५.४ |
| नंदूरबार | ३१.७ | २४.५ |
| नाशिक | २८.९ | २३.५ |
| पुणे | २६ | २२.७ |
| पंढरपूर | ३२.७ | २४.४ |
| सातारा | २९.५ | २३.३ |
| सांगली | ३०.५ | २३.६ |
| सोलापूर | ३२.४ | २४.४ |
| वर्धा | ३८ | २६.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर परगावी जाण्याचे बेत व खाण्या-पिण्याची विविधता यामुळे वेळापत्रक बिघडणे शक्य.

**तुळ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर एखादा मोठा खर्च अनाठायी ठरणार नाही याची काळजी घ्या.

**वृषभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण देवापुढे मागितलेले मागणे प्रत्यक्षात मिळण्याच्या शक्यता चांगल्याच वाढतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व मोठेपणाच्या नावाखाली होणारा खर्च अवाक्याबाहेर जाणार नाही याची काळजी घ्या. मुलांकडे दुर्लक्ष नको.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम यशाच्या शिखराकडे होणारी वाटचाल आपापल्या क्षेत्रात प्रसिद्धी देणारी ठरेल.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पूर्व महत्त्वाचे निर्णय, बैठका शक्यतो पुढे ढकला. सिनेमा, नाटक पहाण्याचा बेत आखाल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण कुटुंबात कलह, आजारपण, किरकोळ अपघात इ.मुळे त्रासदायक प्रसंग येणे शक्य.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व विशेष आदर दाखवून केलेले हट्ट त्या त्या व्यक्तीकडून पुरविले जातील. कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न सुटेल.


**सिंह :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण कामाच्या ठिकाणी आपल्याला न आवडणारे काम मिळाल्यामुळे कामातील उत्साह कमी होईल.

**कुंभ :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम अनुभवी व्यक्तीबरोबर होणारी उठबस आपल्या ज्ञानात भर टाकेल.

**कन्या :** शुभ रंग: निळा,शुभ दिशा: दक्षिण शक्यतो ज्या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे असे निर्णय शक्यतो पुढे ढकला.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पूर्व कोणताही खर्च करताना 'अंथरूण पांघरून पाहून पाय पसरावे' हा सल्ला दिलेला महत्त्वाचा ठरेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३४



### आडवे शब्द

१. आजोबांचे वडील
४. माजघरातील भांडण
७. तात्काळ चपखल उत्तर देणारा
१२. ठिबकणारा, गळणारा
१४. ग्रामीण बोलीत साप-नाग इ.
१५. कट्टर
१७. पगारपुस्तक
२०. त्या प्रमाणे
२२. महामार्गावरील खाद्यसंस्कृतीचे उगमस्थान
२३. रत्न (हिंदी)
२८. पालिकेचा प्रवेशकार
२९. जून, निबर
३१. कौतुकाचे भरते
३३. बगीचा
३४. बनकर
३६. '--खावे लोखंडाचे, तेव्हा ब्रह्मपदी नाचे'
३७. शोभणारा
३८. चर्चा, भांडण, बोलाचाली
४०. जवळ (हिंदी)
४२. खिशाला बसल्यास खर्च, खाल्ल्यास चटकदार
४३. जहाजांचा धक्का
४५. मोठी टोपली
४६. मोठ्या शिस्तीचा
४७. त्याप्रमाणे
४८. नवऱ्याचा भाऊ
५०. पोते शिवण्याची जाड सुई
५१. सेवक, भक्त
५२. 'दिडदा दिडदा' वाजणारे वाद्य
५४. या आशयाच्या कुंतीच्या आज्ञेने द्रौपदी पांडवांची पत्नी झाली
५५. सावध राहण्याचा इशारा
५७. धान्य असल्यास ढीग, ज्योतिषात फक्त बारा
५८. दंड, शिक्षा
५९. त्रैलोक्यात फिरणारा मुनी
६०. मराठीत वडील
६२. सभ्यतेच्या मर्यादा पाळणारा
६४. दुबळा, गरीब
६५. लाकूड छिलण्याचे हत्यार
६६. धाप
६९. सरकारी असल्यास या सुट्टीचे अनेक प्रकार
७०. पांडवांची नावे
७६. शकुनीचे कौरवांशी नाते
७७. सापडल्यास मार्ग, लागल्यास बङ्ग्याबोळ!
७८. संताप
८०. दर तासातील प्रमाण
८१. अर्धवर्तुळाकृती रचना, बाक
८२. व्यवस्था बघणारा
८३. बूड, मुक्काम ठोकणे

### उभे शब्द

१. बक्षिसाचा बिल्ला, शौर्यचिन्ह
२. देवीच्या नावे मागितलेली भिक्षा
३. लोकमान्यांचे नाव
५. रामदासस्वामींच्या निवासाने पुनित झालेला किल्ला
६. सगळीकडे
७. मक्केची यात्रा
८. नेतृत्वाला समाजातून असणारा पाठिंबा
९. आवाज, ध्वनी
१०. अटीची भाषा
११. पुंगी (हिंदी)
१३. धूर्त, लबाड
१६. वाघाची ललकारी
१८. ही आवाजाची असते आणि पानाचीही!
१९. ललाट
२१. जमिनीच्या मालकी हक्काचा सरकारी दाखला
२५. एकदम स्वच्छ
२७. पर्वत
२८. अधिक लोकांना एकत्र जमण्यास मज्जाव करणारा कायदा
३०. राखणीला असलेला
३१. पुण्यात केवळ वास्तव्याने हे बिरूद मिळते असे नाही!
३२. जेमतेम
३५. हाक
३८. प्रहार, घाव
३९. रंगणारे पान
४१. पद्धतीनुसार
४४. दार
४६. मजबूत, भक्कम
४९. नियम सिद्ध करणारा
५१. नाना-नानीचे व्याही
५३. प्रज्वलीत, तापलेले
५६. पाणकोंबडा
५८. अमजद अली खान यांनी लोकप्रिय केलेले वाद्य
५९. बाई, स्त्री
६१. पूर्वज
६३. प्रेमिकांसाठी हृदयाचे प्रतीकचिन्ह
६७. मेण देणारी माशी
६८. श्रीमंत
६९. वर्दळ, राबता
७१. भयंकर
७२. न थांबता, अखंडपणे
७३. अभिनेता
७४. गायनातील तान
७५. वर-वधूची मिरवणूक
७६. जननी
७९. आग्रह, भीड

### जम्बो शब्दकोडे क्र. १०३३ चे उत्तर

आडवे उत्तर १.पणजोबा ४.धुसफूस ७.हजरजबाबी १२.गळका १४.जनावर १५.कडवा १७.वेतनपत्रक २०.तसा २२.ढाब २३.गट्टी २४.पाचर २६.रतन २८.जकात २९.जरड ३१.साजरा ३८.वादविवाद ४०.करीब ४२.चाट ४३.बंदर ४५.डाल ४६.करडा ४७.तसा ४८.दीर ५०.दाभण ५१.दास ५२.सतार ५४.वाटप कर ५५.खबरदार ५७.रास ५८.सजा ५९.नारद ६०.बाबा ६२.अदबशीर ६४.दीन ६५.पटाशी ६६.दम ६९.रजा ७०.धर्म भीम अर्जुन नकुल सहदेव ७६.मामा ७७.वाट ७८.राग ८०.ताशी ८१.कमान ८२.कारभारी ८३.तळ

उभे उत्तर : १.पदक २.जोगवा ३.बाळ ५.सज्जनगड ६.सर्वत्र ७.हज ८.जनाधार ९.रव १०.जरतर ११.बीन १३.कावेबाज १६.डरकाळी १८.पट्टी १९.कपाळ २१.सातबाराचा उतारा २५.चकाचक २७.नग २८.जमावबंदी ३०.रखवालदार ३१.पुणेकर ३२.कसाबसा ३५.साद ३८.वार ३९.विडा ४१.रीतसर ४४.दरवाजा ४६.कणखर ४९.आसमान ५१.दादादादी ५३.रसरशीत ५६.बदक ५८.सरोद ५९.नार ६१.बापजादे ६३.बदाम ६७.मधमाशी ६८.धनवान ६९.रहदारी ७१.भीषण ७२.अथक ७३.नट ७४.लकेर ७५.वरात ७६.माता ७९.गळ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### गुरुवार पेठेतील पवित्र नाम देवालय चर्चचा १४१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**पुणे : दैनिक संध्या**

गुरुवार पेठेतील ऐतिहासिक आणि सुमारे १४० वर्षांचा वारसा लाभलेल्या पवित्र नाम देवालय (होली नेम चर्च) ने आज १४१ व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्त चर्चमध्ये आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती, तसेच मुख्य प्रार्थनागृहाची फुलांनी सुंदर सजावट करण्यात आली होती. वर्धापनदिनानिमित्त सकाळपासूनच ख्रिस्ती बांधवांनी मोठ्या संख्येने चर्चमध्ये उपस्थित राहून प्रभू येशू ख्रिस्त यांच्या चरणी विशेष प्रार्थना अर्पण केली. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी भक्तिभावाने प्रार्थनेत सहभाग घेतला. यावेळी चर्चचे फादर रेव्ह. अशोक करप यांनी उपस्थितांना चर्चच्या ऐतिहासिक वास्तूची माहिती दिली. तसेच प्रभू येशू ख्रिस्त यांनी मानवजातीला दिलेला प्रेम, शांतता आणि बंधुभावाचा संदेश आपल्या विचारांमधून उलगडून सांगितला. विशेष प्रार्थना संपल्यानंतर फादर रेव्ह. अशोक करप यांनी चर्चच्या प्रवेशद्वारावर उभे राहून सर्व ख्रिस्ती बांधवांना वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांनी एकमेकांना "हॅपी फीस्ट" म्हणत शुभेच्छांचा वर्षाव केला. त्यानंतर चर्चच्या प्रांगणात फादर रेव्ह. अशोक करप यांच्या हस्ते वर्धापनदिनाचा केक कापण्यात आला. या सोहळ्याला रेव्ह. जे. एम. गायकवाड, रेव्ह. आढाव, मनोज येवलेकर, विकास उमापती, आशिष जेम्स, बंगापूरकर सर, दीप्ती चौधरी, प्रशांत जगताप, सूरज थोरात, ऐश्वर्या थोरात, गणेश कल्याणकर, पवन भोंगे, विश्वास ननावरे, हेरॉल्ड मेस्सी यांच्यासह अनेक ख्रिस्ती बांधव आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच राजकीय प्रतिनिधी उपस्थित होते.

### वाहनांच्या प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरु

**पुणे : दैनिक संध्या**

शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण कामकाज करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मौजे दिवे कार्यालय शनिवार दिनांक ८ व ९ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी सुरु ठेवण्यात येणार आहे. स्कूल बस, व्हॅन यांचे वाहनचालक, मालक, संघटना यांनी वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी वाहने मौजे दिवे कार्यालय येथे सादर करुन वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करुन घ्यावे, असे आावाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संदिप खडसे यांनी केले आहे.

### पाथरगाव जुना दगडी इंद्रायणी नदी पूल सुरक्षिततेच्यादृष्टीने वाहतुकीसाठी बंद

**पुणे : दैनिक संध्या**

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ वरील पाथरगाव जुना दगडी इंद्रायणी नदी पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतुक बंद करुन पर्यायी मार्गाने वळविण्यात येत असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले आहेत. त्याअन्वये पुण्याकडून मुंबईकडे जाणारी अवजड वाहने यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग सुरु होताना कि.मी. ९४ येथून वळविण्यात आली आहेत. सोमाटणे फाटा येथून यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर तर वडगाव तळेगाव फाटा येथून यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वळविण्यात येणार आहेत. तसेच मुंबईकडून पुणेकडे जाणारी अवजड वाहने खंडाळा एक्झीट येथून जुन्या हायवे वर येऊ न देता यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाने , लोणावळा-कुसगाव टोलनाका किमी ५५ येथून यशवंतराव मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वळविण्यात येत आहे. नवीन पुलावरुन दुचाकी, तीनचाकी, हलकी चारचाकी वाहने वळविण्यात येत असून मुंबई व पुणे या दोन्ही दिशांकडून येणारी अवजड मालवाहू वाहने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरुन वळविण्यात येत आहेत, असेही कळविण्यात आले आहे.

### मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी

**पुणे : दैनिक संध्या**

राज्यशासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींच्या उच्च शिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजनेसाठी इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन घोडेगावचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक, इतर खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क आणि आरोग्य विमाचा समावेश असणार आहे. शैक्षणिक आकस्मिक, इतर खर्च युएएस व इतर देशांसाठी (युके वगळून) १ हजार ५०० युएस डॉलर तर युकेसाठी १ हजार १०० जीबीपी इतका दरवर्षी देण्यात येईल. शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील आवेदन https://fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भरणे अनिवार्य आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. निकष पूर्ण करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची निवड समितीद्वारे निवड केली जाणार आहे. योजनेबाबत अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन आदिवासी विकास विभागाने केले. योजनचे पात्रता निकष: विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा.पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे तर पीएचडी अभ्यासक्रमासाठी ४० वर्षे वयोमर्यादा निश्चित करण्यात आली. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असावे. टोफेल (टीओईएफएल), आयईएलटीएस किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे. तसेच विद्यापीठांची क्युस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल करण्यात येणार आहे. तर क्युस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. लीना बनसोड, आयुक्त, आदिवासी विकास विभाग: 'राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएचडी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षण घेण्याच्या स्वप्नांना बळ मिळते. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करावेत.

# महापौर महिला आरोग्य अभियानाचा दिमाखात शुभारंभ

## 'निरोगी सखी राहील सुखी' उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; पहिल्याच शिबिरात १,७५६ महिलांची आरोग्य तपासणी

■ पुणे (दै. संध्या)

महिलांचे आरोग्य सुदृढ राहावे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचावी आणि आरोग्याबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून महापालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या 'महापौर महिला आरोग्य अभियानाचा' शुभारंभ शुक्रवारी सिंहगड रस्त्यावरील सर्वे क्रमांक १३०, दांडेकर पूल परिसरात राज्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते झाला. या अभियानाच्या पहिल्याच शिबिरात १,७५६ महिलांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि भारतमाता यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, "महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले 'महापौर महिला आरोग्य अभियान' हा लोकाभिमुख आणि समाजोपयोगी उपक्रम आहे. महिलांचे आरोग्य जपणे ही काळाची गरज असून अशा प्रकारचे अभियान शहरातील प्रत्येक भागात राबविणे आवश्यक आहे. महिलांपर्यंत वेळेवर आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल. या अभियानाचा अधिकाधिक महिलांनी लाभ घ्यावा."

महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून आयोजित या मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराला परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पहिल्याच शिबिरात १,७५६ महिलांनी विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या.

या अभियानाद्वारे महिलांना प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, नियमित आरोग्य तपासणी, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन आणि आरोग्यविषयक जनजागृती उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. हे अभियान केवळ एका दिवसापुरते मर्यादित नसून वर्षभर शहरातील विविध प्रभागांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. पुढील शिबिरांचे वेळापत्रक आणि स्थळांची माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, महापालिकेचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## एक्सेल एंटरटेनमेंट आणि ॲमेझॉन MGM स्टुडिओजकडून 'मिर्झापूर

■ पुणे (दै. संध्या)

■ : द मूव्ही'मधील पहिले गाणे 'दो नंबरी' रिलीज; एक्सेल म्युझिकची दमदार सुरुवात

या वर्षातील सर्वाधिक बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक असलेल्या 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या थिएटर रिलीजपूर्वी एक्सेल एंटरटेनमेंट आणि ॲमेझॉन MGM स्टुडिओज यांनी आज चित्रपटाच्या साउंडट्रॅक अल्बममधील पहिले गाणे 'दो नंबरी' रिलीज केले आहे. हे गाणे हरियाणवी संगीतसृष्टीतील लोकप्रिय कलाकार धांडा न्योलीवाला यांनी लिहिले, संगीतबद्ध केले आणि स्वतःच्या आवाजात सादर केले आहे. जबरदस्त ऊर्जा आणि दमदार बीट्सने सजलेले हे गाणे त्यांच्या बहुप्रतीक्षित बॉलिवूड पदार्पणाची सुरुवात ठरत आहे. तसेच, एक्सेल एंटरटेनमेंटच्या नव्याने सुरू झालेल्या एक्सेल म्युझिक या म्युझिक लेबलअंतर्गत प्रदर्शित होणारे हे पहिले गाणे आहे. धांडा न्योलीवाला हे त्यांच्या चार्टबस्टर गाण्यांसाठी, वेगळ्या शैलीसाठी आणि




दमदार स्टेज परफॉर्मन्ससाठी ओळखले जातात. त्यांचे कोट्यवधी चाहते आहेत आणि त्यांच्या अनेक गाण्यांनी सोशल मीडियावर मोठी लोकप्रियता मिळवली आहे. आता ते त्यांच्या खास सिग्नेचर स्टाइलसह भारतातील सर्वात मोठ्या एंटरटेनमेंट फ्रँचायझींपैकी एक असलेल्या 'मिर्झापूर'चा भाग बनले आहेत.

'मिर्झापूर: द मूव्ही' प्रेक्षकांना पुन्हा एकदा सीझन 1 च्या त्या दमदार दुनियेत घेऊन जाणार आहे. या चित्रपटातून प्रथमच मोठ्या पडद्यावर गुड्डू पंडित (अली फजल), मुन्ना भैया (दिव्येंदू) आणि कालीन भैया (पंकज त्रिपाठी) यांसारखी फ्रँचायझीतील सर्वाधिक लोकप्रिय पात्रे पुनरागमन करताना दिसणार आहेत.

## देशाच्या निवडीपेक्षा संस्थेच्या गुणवत्तेवर चर्चा सुरू

■ पुणे (दै. संध्या)

■ नीट यूजी २०२६ (NEET UG 2026) पुनर्परीक्षा आणि एफएमजीई जून निकालांमुळे परदेशातील वैद्यकीय शिक्षणावर पुन्हा लक्ष केंद्रित

नीट यूजी २०२६ पुनर्परीक्षेचे निकाल जाहीर झाल्यामुळे भारतातील वैद्यकीय इच्छुकांची संख्या आणि त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या जागांमधील तफावतीकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे. परीक्षेला पुन्हा बसण्याचा पर्याय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याने अधिकाधिक विद्यार्थी देशांतर्गत जागेसाठी आणखी एक वर्ष वाट पाहण्याऐवजी मान्यताप्राप्त परदेशी एमबीबीएस मार्गांचा शोध घेण्याचा पर्याय निवडत आहेत. २०२५ मध्ये, देशभरातील सुमारे १.२३ लाख एमबीबीएस जागांसाठी जवळपास २३ लाख विद्यार्थ्यांनी नीट-यूजीसाठी नोंदणी केली होती आणि जवळपास २२ लाख विद्यार्थी परीक्षेला बसले होते. पात्र इच्छुकांच्या मोठ्या घटकासाठी देशात जागा उपलब्ध नाही आणि त्यामुळे मान्यताप्राप्त परदेशी वैद्यकीय पदवी हा केवळ एक पर्याय न राहता विचारपूर्वक निवडलेला मार्ग बनला आहे. अधिकाधिक कुटुंबं या मार्गाचा विचार करत असल्याने या निर्णयाचा पाया अधिक पक्का होत आहे. विद्यार्थ्याने कोणता देश निवडावा याऐवजी कोणती संस्था त्या विद्यार्थ्याला पात्र ठरण्यासाठी आणि वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी सक्षम करेल याकडे आता प्रश्न वळत आहे. नियामक मार्गदर्शकतत्त्वे देखील याला दुजोरा देतात. सध्याची फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन (एफएमजीई) आणि या परीक्षेची जागा घेण्याची शक्यता असलेली नॅशनल एक्झिट टेस्ट (NExT) या दोन्ही परीक्षा पदवीधरांना एका समान मानकावर पारखतात आणि केवळ अभ्यासक्रमाचा कालावधी, क्लिनिकल प्रशिक्षण आणि शिक्षणाचे माध्यम यावरील परिभाषित निकष पूर्ण करणारे उपक्रम भारतात मान्यताप्राप्त पदवीकडे घेऊन जातात. अशा वातावरणात, देशापेक्षा विद्यार्थ्यांच्या पाठीशी असलेले कठोर परिश्रम आणि क्लिनिकल प्रशिक्षण अधिक महत्त्वाचे ठरते. ट्रान्सवर्ल्ड एज्युकेअरचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कॅंडविन पिल्लाई म्हणाले,"आजच्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्याची निवड करणे हे केवळ एखादा देश निवडण्यापुरते उरलेले नाही, तर उत्तम शैक्षणिक दर्जा, अर्थपूर्ण क्लिनिकल अनुभव आणि वैद्यकीय व्यवसायाचा स्पष्ट मार्ग देणाऱ्या संस्थेची निवड करण्याबद्दल आहे. इंग्रजी माध्यमातील अभ्यासक्रम, व्यापक प्रत्यक्ष क्लिनिकल प्रशिक्षण आणि परिचित व सहाय्यक असलेले शिकण्याचे वातावरण यांमुळे फिलिपाईन्स भारतातील विद्यार्थ्यांसाठी सर्वाधिक पसंतीचे गंतव्यस्थान म्हणून उदयास आले आहे. विद्यार्थी आणि पालक अधिक माहितीपूर्ण होत असताना पदवीधर भारतात आणि जागतिक स्तरावर परवाना परीक्षा व यशस्वी वैद्यकीय कारकिर्दीसाठी पूर्णपणे सक्षम आहेत हे सुनिश्चित करण्यासाठी संस्थात्मक गुणवत्ता, नियामक पालन आणि सिद्ध झालेल्या शैक्षणिक निकालांवर अधिक भर देत आहेत."

## नेचरल स्टार नानीचा रौद्र अवतार! 'द पॅराडाइज'चा दमदार टीझर प्रदर्शित

■ पुणे (दै. संध्या)

'द पॅराडाइज' हा 2026 मधील सर्वाधिक प्रतीक्षेत असलेल्या चित्रपटांपैकी एक ठरला आहे. तर या चित्रपटातील 'आया शेर' हे गाणे आधीच मोठे चार्टबस्टर ठरले आहे. दमदार टोन, अप्रतिम व्हिज्युअल्स आणि प्रभावी संवादांनी सजलेल्या अनाउन्समेंट व्हिडिओने याआधीच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. आता निर्मात्यांनी अखेर चित्रपटाचा बहुप्रतीक्षित टीझर प्रदर्शित केला आहे.




सध्या 'द पॅराडाइज' हा पॅन-इंडियन सिनेमातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक चर्चेत असलेल्या चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. या चित्रपटात नेचरल स्टार नानी मुख्य भूमिकेत असून दिग्दर्शनाची धुरा प्रसिद्ध दिग्दर्शक श्रीकांत ओडेला यांनी सांभाळली आहे. 'दसरा'च्या ब्लॉकबस्टर यशानंतर ही जोडी पुन्हा एकत्र आली असून त्यामुळे हा चित्रपट भारतीय सिनेमातील सर्वाधिक प्रतीक्षेत असलेल्या चित्रपटांमध्ये गणला जात आहे. घोषणेपासूनच दमदार पोस्टर्स, आकर्षक प्रमोशनल कंटेंट आणि सुपरहिट 'आया शेर' या गाण्यामुळे हा चित्रपट सतत चर्चेत आहे. या गाण्याला यूट्यूबवर 20 कोटींहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर निर्मात्यांनी अखेर 'द पॅराडाइज'चा दमदार टीझर प्रदर्शित केला आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत हा टीझर जबरदस्त ॲक्शन आणि ड्रामाने भरलेला आहे. श्रीकांत ओडेला यांनी झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवर उभी केलेली रॉ आणि भव्य दुनिया या टीझरमध्ये प्रभावीपणे साकारली आहे.

टीझरमध्ये नेचरल स्टार नानी अतिशय दमदार आणि धडकी भरवणाऱ्या अंदाजात दिसत आहेत, तर राघव जुयाल एका धोकादायक खलनायकाच्या भूमिकेत झळकत असून दोघांमधील जबरदस्त संघर्षाची झलक पाहायला मिळते. टीझरमधील नेत्रदीपक व्हिज्युअल्स, प्रभावी बॅकग्राउंड स्कोअर आणि कथानक यावरून हा चित्रपट मोठा ब्लॉकबस्टर ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचबरोबर निर्मात्यांनी टीझरसह चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेचीही घोषणा केली आहे.

'द पॅराडाइज' आपल्या प्रमोशनल कंटेंटमुळे आधीच नवे विक्रम प्रस्थापित करत आहे. चित्रपटातील 'आया शेर' या गाण्याला यूट्यूबवर 20 कोटींहून अधिक व्ह्यूज आणि 18 लाखांहून अधिक लाइक्स मिळाले आहेत. सोशल मीडियावरही हे गाणे प्रचंड ट्रेंड होत असून इन्स्टाग्रामवर हजारो रील्स तयार करण्यात आल्या आहेत. चाहते नानीचा लूक आणि त्यांचा सिग्नेचर हुकस्टेप मोठ्या उत्साहाने रिक्रिएट करत आहेत.

एसएलव्ही सिनेमाजच्या बॅनरखाली निर्मित 'द पॅराडाइज' हा चित्रपट 24 सप्टेंबर 2026 रोजी हिंदी, तेलुगू, तमिळ, इंग्रजी, स्पॅनिश, बंगाली, कन्नड आणि मल्याळम अशा आठ भाषांमध्ये जगभरातील चित्रपटगृहांत भव्य प्रमाणावर प्रदर्शित होणार आहे. जागतिक प्रेक्षकांपर्यंत हा चित्रपट पोहोचवण्यासाठी निर्मात्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चित्रपट सादर करण्यासाठी कथितरित्या हॉलिवूड स्टार रायन रेनॉल्ड्स यांच्याशी संपर्क साधला असल्याचे सांगितले जात आहे. दूरदृष्टी असलेले दिग्दर्शन, दमदार स्टारकास्ट आणि जागतिक स्तरावरील मांडणीमुळे 'द पॅराडाइज' हा केवळ एक चित्रपट नसून एक भव्य सिनेमॅटिक अनुभव ठरणार असल्याची अपेक्षा असून, प्रेक्षक त्याची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडचा आयपीओ ७ ऑगस्ट २०२६ पासून खुला

■ पुणे (दै. संध्या)

कंपनी टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडने जाहीर केले की, या कंपनीचा प्रारंभिक समभाग विक्री प्रस्ताव (आयपीओ) शुक्रवार,७ ऑगस्ट पासून सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार आहे. अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली लावण्याची तारीख गुरुवार,६ ऑगस्ट असून, हा इश्यू मंगळवार,११ ऑगस्ट २०२६ रोजी बंद होणार आहे. कंपनीला या इश्यूमधून प्राइस बँडच्या कमाल रु.२५१.८८ कोटी निधी उभारण्याची अपेक्षा असून, बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध होण्याचा कंपनीचा मानस आहे. या इश्यूसाठी प्रति शेअर रु.२०० ते रु.२१२ असा प्राइस बँड निश्चित करण्यात आला आहे. किमान ७० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ७० च्या पटीत बोली लावता येणार आहे. खंबाटा सिक्युरिटीज लिमिटेड ही या इश्यूची बुक रनिंग लीड मॅनेजर असून, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ही रजिस्ट्रार म्हणून काम पाहणार आहे. या आयपीओमध्ये ९,५०५,००० इक्विटी शेअर्सचा फ्रेश इश्यू आणि कार्तिकेय कन्स्ट्रक्शन्स (पार्टनरशिप फर्म) या प्रमोटर सेलिंग समभागधारकांच्या २,३७६,००० शेअर्सपर्यंत इक्विटीची ऑफर फॉर सेल यांचा समावेश आहे. प्रत्येकी रु.१० दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सचा हा इश्यू बुक-बिल्डिंग पद्धतीद्वारे सादर करण्यात येत आहे. या इश्यूअंतर्गत ३,५६३,८१० इक्विटी शेअर्स अँकर गुंतवणूकदारांसाठी, १७,८२,६९० इक्विटी शेअर्स हाय नेट वर्थ (एचएनआय) गुंतवणूकदारांसाठी, २,३७६,१५० इक्विटी शेअर्स पात्र संस्थात्मक खरेदीदारांसाठी (क्यूआयबी) आणि ४,१५८,३५० इक्विटी शेअर्स किरकोळ वैयक्तिक गुंतवणूकदारांसाठी (आरआयआय) राखीव ठेवण्यात आले आहेत. रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसनुसार, कंपनीकडून फ्रेश इश्यूमधून उभारण्यात येणाऱ्या निधीपैकी रु.१५० कोटी खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरण्यात येणार आहेत. उर्वरित निधीचा वापर सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टेआणि ऑफरशी संबंधित खर्चासाठी करण्यात येणार आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडने कामकाजातून रु.३४४.९९ कोटी महसूल नोंदवला असून, करानंतरचा नफा (पीएटी) रु.४३.३२ कोटी इतका होता. आर्थिक वर्ष २०२४-२५मध्ये कंपनीने कामकाजातून रु.२७९.५६ कोटी महसूल आणि रु.२८.२० कोटी करानंतरचा नफा (पीएटी) नोंदवला होता.

# एजेंटिक स्केलला चालना : ॲडेसोचा पुणे आणि चेन्नईमध्ये विस्तार

■ पुणे (दै. संध्या)

युरोपमधील आघाडीच्या माहिती-तंत्रज्ञान सेवा आणि सॉफ्टवेअर विकास क्षेत्रातील कंपनी ॲडेसो (adesso) ने पुणे आणि चेन्नई येथे आपल्या भारतीय कामकाजाचा धोरणात्मक विस्तार जाहीर केला आहे. 'एजेंटिक स्केल' या उपक्रमाअंतर्गत हा विस्तार करण्यात येत असून, जागतिक उद्योगांना डिजिटल क्षमता, बुद्धिमान स्वयंचलन आणि आधुनिक सॉफ्टवेअर विकासासाठी नवे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा उद्देश आहे. जागतिक स्तरावर पारंपरिक खर्चकपात-आधारित परदेशी कामकाजाच्या पद्धतीऐवजी जागतिक क्षमता केंद्रे (ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स -जीसीसी) उभारण्याकडे उद्योगांचा कल वाढत आहे. या केंद्रांमधून संयुक्त नवोन्मेष, दुहेरी वितरण प्रणाली आणि संपूर्ण सॉफ्टवेअर विकास प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. पुणे आणि चेन्नई येथील नव्या केंद्रांमुळे पुण्यातील उत्पादन अभियांत्रिकीतील कौशल्य आणि चेन्नईतील उद्योगांसाठी डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता व क्लाऊड आधुनिकीकरणातील क्षमता एकत्र आणली जाणार आहे. कोची येथील विद्यमान केंद्रासह देशभरात अत्याधुनिक तंत्रज्ञानातील कुशल मनुष्यबळाची साखळी उभारण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. ॲडेसो एसईचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क लोहवेबर म्हणाले, "भारतातील आमची कंपनी ही 'जागतिक विचार, स्थानिक कार्य' या धोरणाचे उत्तम उदाहरण आहे. पुणे आणि चेन्नई येथील नव्या नवोन्मेष केंद्रांमधून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा क्षेत्रातील कौशल्य अधिक बळकट करून जागतिक ग्राहकांना स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम सेवा पुरविण्यात येतील."



**थोडक्यात पण महत्वाचे**




## स्वायत्तेमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला, गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन

**पुणे : दैनिक संध्या**

■ प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी) या अग्रगण्य संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्वायत्त (आटोनॉमस) दर्जा प्रदान करण्यात आला आहे. संस्थेच्या शैक्षणिक उत्कृष्टता, नवोपक्रम, संशोधन आणि जागतिक दर्जाच्या शिक्षणाच्या दिशेने वाटचालीतील हा एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. 'एसआयएमएमसी'मध्ये एमबीए, एमसीए, बीबीए आणि बीसीए हे अभ्यासक्रम उपलब्ध असून, उद्योगाभिमुख कौशल्ये, नेतृत्वगुण, संशोधनवृत्ती आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून भविष्यातील सक्षम व्यावसायिक घडविण्यावर संस्थेचा भर आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता आणि 'नॅक'कडून 'ए' श्रेणी प्राप्त एसआयएमएमसी'ने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, उद्योग-संलग्नता, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी केली आहे. स्वायत्त दर्जामुळे संस्थेला अभ्यासक्रमांची रचना, मूल्यमापन पद्धती, उद्योगाभिमुख विषयांचा समावेश, संशोधनाला चालना तसेच नवोपक्रमशील शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे अधिक स्वातंत्र्य मिळणार आहे. बदलत्या जागतिक आणि डिजिटल युगाशी सुसंगत अभ्यासक्रम विकसित करताना कौशल्याधारित शिक्षण, लवचिक मूल्यमापन, लाइव्ह प्रोजेक्ट्स, उद्योगाभिमुख इंटर्नशिप, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि अनुभवाधारित शिक्षणावर अधिक भर दिला जाणार आहे. स्वायत्ततेमुळे 'एसआयएमएमसी'ला जागतिक उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजा आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन अत्याधुनिक व उद्योगाभिमुख ऐच्छिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि जनरेटिव्ह एआय, सोशल मीडिया व डिजिटल जाहिरात, इन्फ्लुएंसर व कंटेंट क्रिएटर मार्केटिंग, ग्राहकांच्या ऑनलाइन वर्तनाचा अभ्यास, ग्राहकांच्या आवडी-निवडी समजून घेऊन मार्केटिंग करण्याच्या पद्धती, ऑनलाइन खरेदी-विक्री आणि डिजिटल व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक अहवाल समजून घेणे व कंपन्यांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण, पर्यावरणपूरक व जबाबदार व्यवसाय आणि गुंतवणूक, व्यक्तिमत्त्व व क्षमता ओळखण्यासाठी मानसशास्त्रीय चाचण्या, नेतृत्वगुण व भविष्यातील नेतृत्वाची तयारी, व्यवसायातील जोखीम ओळखून त्याचे विश्लेषण, सोशल मीडिया आणि वेबसाइटच्या कामगिरीचे विश्लेषण, क्लाउड तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डेटाचे विश्लेषण, शेतीमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, कृषी व्यवसाय व धोरणे, ऑनलाइन ग्राहकांशी संबंध व्यवस्थापन, ऑनलाइन पार्टनरच्या माध्यमातून विक्री वाढविण्याच्या पद्धती, ई-कॉमर्स व ऑनलाइन मार्केटप्लेसचे व्यवस्थापन तसेच व्हिडिओ मार्केटिंग आणि YouTube चॅनेलची प्रभावी रणनीती अशा भविष्योन्मुख विषयांचा अभ्यास करण्याची संधी मिळू शकेल. या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल व्यवसाय, डेटाच्या आधारे योग्य निर्णय घेणे, ग्राहकांना समजून घेणे, आर्थिक नियोजन, शाश्वत व्यवसाय, नेतृत्व, नवकल्पना आणि उद्योजकता यांचा प्रत्यक्ष व व्यावहारिक अनुभव मिळेल.

## बारामतीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याचा आरोप

**बारामती : दैनिक संध्या**

■ ५९ वर्षीय व्यक्तीविरुद्ध पोक्सोसह अॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा

बारामती शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याचा आरोप ५९ वर्षीय व्यक्तीवर करण्यात आला असून, या प्रकरणी भारतीय न्याय संहिता, बाल लैंगिक अत्याचार संरक्षण (पोक्सो) अधिनियम तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमांतर्गत गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, देविदास नारायण शिंदे (वय ५९) याच्यावर अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन करून तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. आरोपी हा फिर्यादीच्या घराजवळ राहतो. संबंधित अल्पवयीन मुलीचा जन्म ९ सप्टेंबर २०१७ रोजी झाल्याची नोंद अधिकृत कागदपत्रांमध्ये आहे. फिर्यादी महिलेच्या म्हणण्यानुसार, ६ ऑगस्ट २०२६ रोजी शाळेतून घरी आल्यानंतर मुलीने तिच्यासोबत घडलेला प्रकार आईला सांगितला. त्यानंतर महिलेने तातडीने बारामती शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. तक्रारीची प्राथमिक पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१४/२०२६ अन्वये ६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ९.१६ वाजता आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ७४ व ७५, पोक्सो अधिनियम, २०१२ मधील कलम ८, ९(एम) व १० तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ मधील कलम ३(१)(डब्ल्यू)(i) व ३(१)(डब्ल्यू)(ii) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व कलमांनुसार प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील तपास सुरू आहे. घटनेचा तपास पोलीस अधिकाऱ्यांकडून सुरू असून, संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदविणे, घटनास्थळाची पाहणी करणे तसेच उपलब्ध पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, पीडित मुलगी अल्पवयीन असल्याने तिची ओळख कायद्यानुसार पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात आली आहे. तसेच आरोपीवरील आरोप हे फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवर आधारित असून, या प्रकरणातील अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेनंतरच होणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# डॉ. काकोडकर समितीचे स्वागत पण झारीतील शुक्राचार्य कोण?

## पुणे नाशिक रेल्वेमार्ग नारायणगाव, संगमनेर मार्गेच व्हावा - खासदार डॉ. अमोल कोल्हे

■ पुणे (दै. संध्या)

पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे संदर्भात जीएमआरटीचे आक्षेप समजून घेण्यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमल्याबद्दल खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानताना नेमकं 'झारीतील शुक्राचार्य' कोण आहेत असा सवाल विचारला, त्याचबरोबर हा रेल्वे प्रकल्प जुन्या मार्गानेच व्हावा ही आपली स्पष्ट भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे जुन्या मार्गानेच व्हावी या मागणीसाठी क्रांती दिनी (९ ऑगस्ट रोजी) चक्का जाम आंदोलन होणार आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. कोल्हे यांनी डॉ. काकोडकर समिती नेमल्याबद्दल आभार मानताना काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करणारा व्हिडिओ जारी केला आहे. या प्रकल्पाचा घटनात्मक सांगताना खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, हा रेल्वे प्रकल्प व्हावा यासाठी राज्य शासन आणि रेल्वे यांची ५०-५० टक्के भागीदारी असलेली कंपनी (एसपीव्ही) स्थापन करण्याच्या तत्कालिन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्या सूचनेनुसार सन २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची (महारेल) स्थापना करण्यात आली आणि महारेलवर या प्रकल्पाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानुसार २०१८ मध्ये पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा डीपीआर तयार करण्यात आला.

दरम्यान २०१९ मध्ये जनतेने खासदार म्हणून माझ्यावर जबाबदारी टाकल्यानंतर मी तत्कालिन महाविकास आघाडी सरकारचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्याकडे या प्रकल्पाचे सादरीकरण केले होते. हे सादरीकरण पाहिल्यावर स्व. अजितदादा पवार यांनी हा प्रकल्प झालाच पाहिजे अशी भूमिका घेत त्याला चालना दिली. इतकंच नव्हे तर या प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियाही सुरू केली होती. अचानक २०२२ मध्ये राज्यात सरकार बदललं आणि माशी शिंकली. त्यानंतर जीएमआरटीचे आक्षेप असल्याची चर्चा सुरू झाली आणि प्रकल्प प्रलंबित ठेवण्यात आला. या संदर्भात संसदेत आवाज उठवल्यानंतर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी डिपार्टमेंट ऑफ अॅटोमिक एनर्जीने या संदर्भात चर्चा केली असून जीएमआरटीचे आक्षेप आहेत असे कळवल्याने संगमनेर, आळेफाटा, मंचर, मार्गे पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प होऊ शकत नाही. त्यामुळे हा प्रकल्प रद्द करण्यात आला असल्याचे उत्तर संसद सभागृहात दिले. परंतु ज्यावेळी जीएमआरटीला माहितीच्या अधिकाराखाली हा विचारण्यात आला त्यावेळी जीएमआरटीने दिलेल्या उत्तरात डिपार्टमेंट ऑफ अॅटोमिक एनर्जी या संस्थेकडे या संदर्भात काहीच चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे. मग प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे नेमकं खोटं कोण बोलतं, आणि का बोललं जातंय? मग या प्रकल्पामध्ये झारीतील शुक्राचार्य कोण आहेत? या महत्त्वाच्या प्रश्नावर खासदार डॉ. कोल्हे यांनी नेमके बोट ठेवले आहे.

ते पुढे म्हणाले की, संसदेत आपण या प्रकल्पासंदर्भात मुद्दा मांडला होता, त्यात जगात १४ ठिकाणी रेडिओ टेलिस्कोप आणि रेल्वे एकत्र आहेत असं असताना आम्ही देशाला जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणतो, स्वतःला विश्वगुरु म्हणवतो, पण जगातील १४ देशांना जे शक्य होतं ते आम्हाला का नाही होत. मग प्रश्न निर्माण होतो तो, इतर कुणाचा यामध्ये वेगळा हेतू आहे का? कारण महारेलकडून हा प्रकल्प रेल्वेकडे गेला आणि तिथूनच एक नन्नाचा पाढा सुरू झाला. हा रेल्वे प्रकल्प जुन्या मार्गानेच व्हावा यासाठी ठाम भूमिका घेणं ही नितांत व महत्त्वाची आहे. कारण एमआरआयडीसीने ५० टक्के निधी द्यावा ही संकल्पना सुरेश प्रभू रेल्वेमंत्री असताना पासूनची आहे, असे असताना इतकी वर्षे सुरू असलेली गोष्ट अचानक आक्षेप घेतला जातो आणि त्याच्यावर काही पर्याय निघू शकतो याचा विचार न करता त्याचा मार्ग बदलला जातो. हा मार्ग सुद्धा 'काखेत कळसा गावाला वळसा' असा असल्याचे स्पष्ट करताना खासदार डॉ. कोल्हे यांनी आधीचा पुणे-भुसावळ २९० कि.मी.चा होता, तर आता जो अहिल्यानगर, मार्गे करण्याचा प्रयत्न केला जातो आहे, तो साधारणतः ३१० ते ३३० कि.मी. इतका आहे. मग आधीचा २९० कि.मी. होता याकडे त्यांनी लक्ष वेधले. उलट मंचर, नारायणगाव, संगमनेर मार्गे नाशिक जाणारा सरळ मार्ग हा २३५ कि.मी म्हणजे अवघ्या पावणे दोन तासात पोहोचणारा होता. पण प्रश्न निर्माण होतो तो, नेमकी माशी कुठे शिंकली.



पुणे नाशिक रेल्वे जुन्या मूळ मार्गानेच व्हावी ही माझी पहिल्यापासूनची भूमिका आहे हे स्पष्ट करीत खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, पण यासाठीची लढाई काही प्रमाणात दिल्लीत तर काही प्रमाणात राज्य सरकारच्या विरोधात लढावी लागणार आहे. त्यांना जाब विचारावा लागेल आणि त्याची जर तयारी असेल तर या लढाईत सगळ्यांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहू असे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन केले की, या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून आली भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यामुळे हा प्रकल्प व्हावा यासाठी तुम्ही पुढाकार घ्या, त्यासाठी हवं तर ज्या १४ देशांत रेडिओ टेलिस्कोप आणि रेल्वे एकत्र सुरू आहेत, त्याचा रेल्वे मंत्रालयाला पाठवलेला स्टडी रिपोर्ट आपल्यालाही पाठवायची माझी तयारी आहे. कारण पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प हा मंचर, नारायणगाव, संगमनेर मार्गे नाशिक असाच व्हायला ही माझी आणि या भागातील जनतेची इच्छा आहे, असे खासदार डॉ. कोल्हे यांनी सांगितले.

आता जीएमआरटी बाबत काही जण आक्षेप घेत आहेत. जीएमआरटी हा आंतरराष्ट्रीय दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रकल्प असून जवळपास २९ देशांचा यात सहभाग आहे. त्यामुळे देशाचे असणारे परराष्ट्र संबंध पाहता यावर काही मध्यम मार्ग काढणे गरजेचे आहे. मग जमिनीवरील वायरलेस टनेल असेल किंवा भूमिगत टनेल असेल. कदाचित जीएमआरटी मंचर ते आळेफाटा दरम्यान भूमिगत टनेलचा पर्याय डॉ. काकोडकर समितीसमोर ठेवेल. पण हा भूमिगत ट्रॅक झाल्यानंतर पुन्हा प्रश्न निर्माण होतो तो, जुन्नर तालुका आणि काही प्रमाणात आंबेगाव तालुक्याचे सर्वसाधारण विकासाची जी तूट निर्माण झाली आहे, त्याच्या नुकसान भरपाईचे काय? असा प्रश्न उपस्थित करून खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, संगमनेर, सिन्नर, अकोलेच्या लोकांना त्याचा फायदा होईल. पण संपूर्ण स्टेशन जर जमिनीखाली झालं तर याचा नेमका फायदा कसा होणार याची स्पष्टता होणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. त्याचबरोबर इतक्या मोठ्या लांबीच्या भूमिगत टनेलचा पर्याय दिल्यावर येणारा मोठा खर्च पाहता रेल्वेही हात वर करण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.


जर राज्य सरकार यात ५० टक्के निधी देणार असेल, प्रकल्पासाठी जमीन देणार आहे, असं असताना राज्य सरकारचाच स्टेक नाही, तर मग राज्य सरकारला जाब नको विचारायला? असा प्रश्न करीत खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, जर आम्ही ५० टक्के निधी देतो आहोत, जमीन देतो आहोत तर अलाईन्मेंट आमच्या म्हणण्याप्रमाणे हवी हे ठामपणे सांगण्यासाठी पाठीचा कणा आपल्याकडे नाही आहे का? असा तिखट सवाल उपस्थित केला.

## रेकिट आणि एएससीआय यांनी 'स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा अधिक सुरक्षित करण्यासाठी''सेफर चॅलेंज' स्पर्धा केली सुरू

■ परवडणारी वायूशोधक उपकरणे विकसित करण्यासाठी राष्ट्रीय स्पर्धेद्वारे नवकल्पना संशोधकांना आमंत्रण, विजेत्या उत्पादांना अनुदान, मार्गदर्शन आणि प्रायोगिक संधी मिळणार

■ पुणे (दै. संध्या)

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला अधिक बळ देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याच्या उद्देशाने रेकिट आणि ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया यांनी 'सेफर चॅलेंज' ही स्पर्धा सुरू केली आहे. हे अशा प्रकारचे पहिलेच नाविन्यपूर्णतेचे राष्ट्रीय आव्हान आहे. यामध्ये स्टार्टअप्स, अभियंते, संशोधक, शैक्षणिक संस्था आणि तंत्रज्ञान इनोव्हेटर्सना गटार आणि सेप्टिक टँक साफसफाईच्या कामांदरम्यान सुरक्षा सुधारण्यासाठी मदत करणारी परवडणारी, परिधान करण्यायोग्य वायूशोधक उपकरणे विकसित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. भारतात स्वच्छतेची पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यात येत आहे. अशा वेळेस स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे हे तितकेच महत्त्वाचे आव्हान आहे. विषारी वायू आणि ऑक्सिजनची कमतरता असलेल्या वातावरणाच्या संपर्कात येणे हे मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. कामगारांची सुरक्षा अधिक मजबूत करतील आणि त्याच वेळी भारताच्या अधिक सुरक्षित व अधिक यांत्रिकीकृत स्वच्छता प्रणालींच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना पूरक ठरतील, अशा नवकल्पनांना 'सेफर चॅलेंज'च्या माध्यमातून प्रोत्साहन देणे हा रेकिट आणि एएससीआय यांचा उद्देश आहे.




धोकादायक वायूंचा रिअल-टाइममध्ये शोध घेण्यास सक्षम असलेले वापरता येण्याजोगे तंत्रज्ञान विकसित करण्याकरिता संपूर्ण भारतातील स्टार्टअप्स, वैयक्तिक अभियंते, डिझाइनर्स आणि इनोव्हेटर्ससाठी अर्ज आता खुले झाले आहेत. जी उत्पादने परवडणारी आहेत, प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात वापरण्यास सोपी आहेत आणि स्वच्छतेच्या कामांदरम्यान वेळेवर हस्तक्षेप करण्यास साहाय्य करणारे असतील, अशा उपायांचा या स्पर्धेत शोध घेतला जात आहे. हा उपक्रम भारत सरकारच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेशी सुसंगत असून, 'स्वच्छ भारत मिशन २.०', 'नमस्ते' आणि 'सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज' यांसारख्या कार्यक्रमांना पूरक आहे.

या शुभारंभप्रसंगी बोलताना रवी भटनागर, कम्युनिकेशन्स अँड कॉर्पोरेट अफेअर्स डायरेक्टर, दक्षिण आशिया, एमईएनएआरपी (MENARP) आणि आफ्रिका म्हणाले, "शौचालयांची उपलब्धता वाढवण्यात भारताने लक्षणीय प्रगती केली आहे; पुढील टप्प्यात स्वच्छता अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि शाश्वत बनवण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. रेकिटमध्ये नेहमी योग्य तेच करणे हा आमच्या कार्यपद्धतीचा गाभा आहे. त्यामुळे आमच्या कृतींचा समाजावर दीर्घकाळ टिकणारा सकारात्मक परिणाम होईल याची आम्ही सुनिश्चिती करतो. हार्पिक वर्ल्ड टॉयलेट कॉलेजच्या माध्यमातून, आम्ही स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी कौशल्ये निर्माण करून आणि त्यांच्या सन्मान व सुरक्षिततेचे समर्थन करून स्वच्छता परिसंस्थेला बळकट करत आहोत. या स्पर्धेत विजेत्याला ५ लाख रुपये , प्रथम उपविजेत्याला २ लाख रुपये आणि द्वितीय उपविजेत्याला १ लाख रुपयांचे रोख अनुदान, तसेच त्यांच्या नवकल्पनांचा अधिक व्यापक स्वीकार होण्याच्या संधीही उपलब्ध आहेत. अर्ज १ सप्टेंबरपर्यंत खुले असून, विजेत्यांची घोषणा २ ऑक्टोबर रोजी केली जाईल. इच्छुक नवसंशोधक https://asci.org.in/safer येथे त्यांचे अर्ज सादर करू शकतात.

## विवोने भारतात नवीन विवो एस२ Vivo S2 केला सादर

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

विवो इंडियाने आज आपल्या नवीन विवो एस२ (Vivo S2) च्या लॉन्चची घोषणा केली, ज्यामुळे भारतात एस-सिरीजचे (S-series) पुनरागमन झाले आहे. उत्कृष्ट कारागिरी, फ्लॅगशिप-स्तरीय डिझाइन, प्रगत इमेजिंग क्षमता आणि विश्वसनीय दैनंदिन कामगिरी यांचा मेळ साधणारा विवो एस२ (Vivo S2) अशा पिढीसाठी डिझाइन केला आहे, जी आपल्या स्मार्टफोनला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि शैलीचा एक भाग मानते. प्रीमियम मिड-रेंज सेगमेंटमध्ये विवोचे स्थान अधिक मजबूत करणारा विवो एस२ (Vivo S2), आजच्या बदलत्या ग्राहकांसाठी सौंदर्य, सर्जनशीलता आणि व्यावहारिकता यांचा परिपूर्ण मिलाफ सादर करतो. स्व-अभिव्यक्तीच्या तत्त्वज्ञानावर आधारित, विवो एस२ (Vivo S2) तरुण वापरकर्त्यांना सहजतेने निर्मिती करण्यास, कनेक्ट होण्यास आणि शेअर करण्यास सक्षम करतो. अविस्मरणीय क्षण टिपणे असो, कंटेंट तयार करणे असो, दिवसभर मल्टीटास्किंग करणे असो किंवा उत्तम मनोरंजनाचा आनंद घेणे असो, हा स्मार्टफोन आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेण्यासाठी आणि एक अखंड दैनंदिन अनुभव देण्यासाठी डिझाइन केला आहे. विवो एस२ सिल्क व्हाइट, सफायर ब्लू आणि रीगल ब्रॉंझ या तीन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असेल. हे डिव्हाइस ११ ऑगस्ट २०२६ पासून विवोच्या अधिकृत




वेबसाइट, फ्लिपकार्ट, ॲमेझॉन आणि पार्टनर रिटेल स्टोअर्सवर उपलब्ध होईल. या लॉन्चवर भाष्य करताना, विवो इंडियाच्या चीफ कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स ऑफिसर, गीताज चन्नना म्हणाल्या: "स्मार्टफोन बाजारपेठेत मोठे परिवर्तन झाले आहे; तरुण ग्राहक आता फ्लॅगशिप सेगमेंटमध्ये न जाता प्रीमियम अनुभवाच्या शोधात आहेत. एस-सिरीजचे पुनरागमन हा या बदलाला आमचा प्रतिसाद आहे. विवो एस२ विशेषतः अशा तरुण ग्राहकांसाठी डिझाइन केला आहे, जे स्टाईल, सर्जनशीलता, स्मार्ट अनुभव आणि कार्यात्मक नावीन्य यांना महत्त्व देतात.

# अन्यायाविरोधात डॉक्टरांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

■ पुणे (दै. संध्या)

डॉक्टरांवर गेल्या काही दिवसांत रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून सतत हल्ले, पोलिस तक्रारी यांसारखे काही ना काही होत आहे. तसेच समाजकंटकांकडून केल्या जाणाऱ्या खोट्या तक्रारींमुळे पोलिसांकडूनही डॉक्टरांना त्रास दिल्या गेल्याच्या घटना घडल्या आहेत. या सगळ्याचा निषेध करण्यासाठी आणि डॉक्टरांच्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी डॉक्टर प्रोटेक्शन फोर्सच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करत आंदोलकांनी निवासी जिल्हाधिकारी ज्योती कदम यांना निवेदन दिले.

डॉक्टरांना न्याय मिळावा, खोट्या तक्रारींना आळा बसावा आणि वैद्यकीय व्यवसायाला संरक्षण मिळावे, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. डॉक्टर हे समाजाचे रक्षक आहेत. मात्र त्यांच्याविरोधातच अनेकदा धमक्या, मारहाण, पोलीस तक्रारी, दवाखान्याची तोडफोड अशा घटना घडतात. यामुळे डॉक्टरांचा मानसिक छळ होतो आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते. याकडे शासकीय यंत्रणेने वेळीच लक्ष द्यावे यासाठी डॉक्टर प्रोटेक्शन फोर्सचे मुख्य समन्वयक उमेश चव्हाण यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी डॉ. शिवराज




पाटील, डॉ. मंदार सावजी, डॉ. संतोष तळेकर, डॉ. अतुल सोनावणे, डॉ. समीर बदामी, डॉ. सिद्धार्थ शिंदे, रुग्ण हक्क परिषदेच्या अपर्णा मारणे साठे यांच्यासह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते.

यावेळी संघटनेने डॉक्टरांवरील हल्ले, अत्याचाराविरोधात तत्काळ कठोर कारवाई करावी, डॉक्टरांविरोधात तक्रार असेल तर पोलीसांनी चौकशीपूर्वी त्यांना आरोपी किंवा गुन्हेगारासारखी वागणूक देऊ नये, डॉक्टरांचा सन्मान राखला जावा यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन देण्यात यावे या मागण्या प्रामुख्याने मांडल्या. डॉक्टर, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन यांच्यात नियमित समन्वय बैठक आयोजित करावी, जिल्हास्तरावर डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरुपी समन्वय समिती स्थापन करावी, यांसारख्या मागण्या करण्यात आल्या.

उमेश चव्हाण म्हणाले, "डॉक्टर सुरक्षित असतील, तरच समाजाला चांगल्या आरोग्य सुविधा मिळू शकतात. त्यामुळे आम्ही केलेल्या मागण्यांचा गांभिर्याने विचार व्हायला हवा. डॉक्टरांनी जर काम करणे बंद केले तर समाजाचे जगणे अवघड होईल. त्यामुळे त्यांचा माणूस म्हणून विचार व्हायला हवा. रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी शांतपणे गोष्टी समजून घेऊन, डॉक्टरांशी योग्य पद्धतीने संवाद साधायला हवा. जेणेकरुन डॉक्टरांना त्यांचे काम करता येईल आणि समाजातील कोणत्याच घटकाला त्रास होणार नाही." डॉ. अवसाफ यांनी डॉक्टरांची बाजू मांडताना रुग्ण डॉक्टरांना देवाचा दर्जा देतात. मात्र तेही माणूस असतात हे लक्षात घेत नाहीत. कोणताही डॉक्टर रुग्णाचा जीव वाचवण्याचाच प्रयत्न करत असतो. पण आरोग्याच्या तक्रारी हाताबाहेर जातात, तेव्हा डॉक्टरांकडेही काही पर्याय उरत नाही, हे रुग्णांनी समजून घ्यायला हवे. अनेकदा विनाकारण डॉक्टर, हॉस्पिटल यांना बदनाम केले जाते. याचा डॉक्टरांना तर ताण होतोच. पण पोलीस, प्रशासन, कायदा व्यवस्था या सगळ्यांवरच याचा ताण येतो."

TRTI | barti | सारथी | महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अमृत | ARTI शिक्षण संघटन विकास

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, (टीआरटीआय), पुणे**
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे-४११००१
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
Website- trti.maharashtra.gov.in

**सन २०२६-२७ करिता बार्टी, टीआरटीआय, सारथी, अमृत व आर्टी या संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या विधी (न्यायिक सेवा) पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) करिता उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत....**

बार्टी, टीआरटीआय, सारथी, अमृत व आर्टी या संस्थांमार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासाकरिता विविध प्रकल्प सारथा, अमृत व आटा या सस्थामार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासाकरिता विविध प्रकल्प, योजना राबविल्या जातात. तसेच सदर लाभार्थी गटातील युवक आणि युवतींकरीता विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. सदर स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनामार्फत सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार उक्त संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या विधी (न्यायिक सेवा) पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेकरिता स्पर्धा परिक्षा पूर्व मार्गदर्शन देऊन शासकिय नोकरीची संधी मिळावी म्हणून खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्याकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेचा सविस्तर तपशिल, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ http://trti.maharashtra.gov.in ला भेट देऊन या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवरुनच ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड ही सामयिक प्रवेश परिक्षा (Common Entrance Test - CET) व्दारे गुणांकन पध्दतीने करण्यात येणार आहे.

पात्र व इच्छुक उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, आरक्षण व सीईटीमधील प्राप्त गुणांनुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती यांचेकडे राहतील.


| | | |
|---|---|---|
| ✦ अर्ज करण्याचा सुरु दिनांक | :- | ०९/०८/२०२६ |
| ✦ अर्ज करण्याचा अंतिम दिनांक | : | २३/०८/२०२६ |

सही/-
(निलेश सागर, भा.प्र.से.)
आयुक्त, टीआरटीआय पुणे तथा अध्यक्ष, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती

विमाका/पुणे/जाहि./११४/२०२६-२७



## थोडक्यात पण महत्वाचे



## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मिसिंग लिंक बोगद्यात भीषण अपघात

**पिंपरी : दैनिक संध्या**

मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक बोगद्यात मध्यरात्री दीडच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात पिंपरी-चिंचवडमधील वाकड येथील युवा नेते तुषार भूमकर यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तुषार भूमकर हे पुण्यावरून मुंबईच्या दिशेने त्यांच्या फॉर्च्युनर कारने प्रवास करत होते. मिसिंग लिंक बोगद्यात त्यांच्या कारने समोरून जात असलेल्या मालवाहू टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, कारचा अक्षरशः चुराडा झाला आणि तुषार भूमकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातात कारमधील आणखी तीन ते चार जण जखमी झाले आहेत. त्यापैकी एका व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात असून त्याला तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. इतर तिघांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, आयआरबीचे कर्मचारी आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तातडीने बाहेर काढून रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातग्रस्त वाहने बाजूला केल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. दरम्यान, या अपघातामुळे मिसिंग लिंक बोगद्यात काही काळ मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या प्रकरणाचा पुढील तपास महामार्ग पोलीस करत आहेत.



## अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त वसंतराव कुदळे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे सेवानिवृत्त प्रशासन अधिकारी तसेच इंद्रायणी सहकारी बँकेचे संचालक वसंतराव बाबुराव कुदळे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. काळेवाडी येथील 'रागा पॅलेस'मध्ये बुधवारी सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमास राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, बँकिंग आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कुदळे यांना अभिष्टचिंतन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष वसंतनाना लोंढे, माजी नगरसेवक हरेश आसवानी, रंगनाथ कुदळे, शांती सेन, चंद्रकांत भोळे, सुरेश म्हेत्रे, राजेंद्र गावडे, नगरसेविका प्रियंका कुदळे, निकिता कदम, इंद्रायणी सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष एस. बी. चांडक, उपाध्यक्ष महेश चांडक, संचालक सुरेश जुमानी, जयहिंद बँकेचे संचालक बापू आल्हाट, पिंपरी-चिंचवड हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष गणेश कुदळे, 'सकाळ'चे जाहिरात व्यवस्थापक मिलिंद भुजबळ, माजी सहायक आरोग्य अधिकारी प्रकाश जवळकर, युवा नेते ऋषिकेश संजोग वाघेरे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष वसंत तावरे, कामता प्रसाद पटेल, निमगाव दुडेचे सरपंच रामभाऊ गायकवाड, दिशा सोशल फाऊंडेशनचे उपाध्यक्ष संतोष बाबर, संचालक भरत आल्हाट, प्रबोधनकार शारदा मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी इंद्रायणी सहकारी बँकेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष एस. बी. चांडक आणि संचालक सुरेश जुमानी यांच्या हस्ते वसंतराव कुदळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कुदळे यांच्या प्रशासकीय कारकिर्दीचा, सामाजिक बांधिलकीचा आणि सहकार क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात 'सरगम ग्रुप'च्या वतीने संगीतमय मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे उपस्थितांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंददायी वातावरणाचा अनुभव घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वसंतराव कुदळे यांचे चिरंजीव विक्रम कुदळे व विशाल कुदळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन श्रीकांत कदम यांनी केले, तर शिक्षण मंडळाच्या माजी सभापती गिरीजादेवी प्रवीण कुदळे यांनी आभार प्रदर्शन केले.

## आधार केंद्रात नागरिकांची हेळसांड; ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांची मोठी गैरसोय

**वल्लभनगर : दैनिक संध्या**

एकीकडे डिजिटल इंडियाचा गाजावाजा केला जात असताना, दुसरीकडे नागरिकांना अत्यावश्यक असलेल्या आधार सेवा केंद्रांवर मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याचे वास्तव वल्लभनगर येथे समोर आले आहे. वल्लभनगर येथील बॅडमिंटन हॉल परिसरातील आधार केंद्रावर दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येतात. मात्र, येथे बसण्याची व्यवस्था, पावसापासून संरक्षणासाठी शेड, प्रतीक्षागृह तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांगांची अक्षरशः हेळसांड होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून, अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे नागरिकांची गैरसोय अधिकच वाढली आहे. केंद्राबाहेर छत नसल्याने नागरिकांना पावसात भिजतच रांगेत उभे राहावे लागते. उन्हाळ्यातही उन्हाचा तडाखा सहन करत तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. लहान मुलांना कडेवर घेऊन आलेल्या महिलांपासून काठीच्या आधाराने चालणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. आधार कार्ड हे आज बँकिंग व्यवहार, शासकीय योजना तसेच विविध सेवांसाठी अत्यावश्यक कागदपत्र बनले आहे. अशा महत्त्वाच्या केंद्रावर नागरिकांसाठी किमान सुविधा उपलब्ध नसणे ही प्रशासनाच्या नियोजनातील गंभीर त्रुटी असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेकदा दोन ते तीन तास रांगेत उभे राहावे लागते. मात्र, बसण्यासाठी एकही बाक किंवा खुर्ची उपलब्ध नाही. पावसापासून संरक्षणासाठी शेड नसल्याने ज्येष्ठ नागरिक महिला आणि दिव्यांगांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, पिण्याच्या पाण्याचीही कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांचा संताप व्यक्त होत आहे. आधार सेवा केंद्रावर येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि सुलभपणे सेवा मिळावी, यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ग्रामस्थांच्या प्रश्नांवर महापौर यांच्यासोबत सकारात्मक चर्चा

### शहराच्या पाणीपुरवठ्याला बाधा न आणता प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर व गावाच्या विकासकामांवर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याचे आश्वासन

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्पाच्या अनुषंगाने शिवे–वाकी तर्फे वाडा येथील प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आज महापौर रवि लांडगे यांची भेट घेऊन गावातील प्रलंबित विकासकामे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.



यावेळी ग्रामस्थांनी भामा-आसखेड प्रकल्पासाठी दिलेल्या सहकार्याच्या पार्श्वभूमीवर गावातील पाणीपुरवठा व जलवाहिनीची प्रलंबित कामे, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे काँक्रिटीकरण, वीजपुरवठा, सांडपाणी व गटार व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, स्मशानभूमी व परिसराचे सुशोभीकरण, मंदिर परिसरातील आवश्यक सुविधा, सभागृह, खेळाचे मैदान, वृक्षारोपण तसेच इतर मूलभूत विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच भामा-आसखेड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या ग्रामस्थांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर महापालिका प्रशासनामार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

ग्रामस्थांनी विविध मागण्या मांडल्यानंतर महापौर रवि लांडगे यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा केली. प्रत्येक मागणीची वस्तुनिष्ठ माहिती घेऊन संबंधित विभागांमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्या आणि गावाच्या विकासकामांबाबत सकारात्मक भूमिका घेऊन टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

> यावेळी ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध विषयांबाबत संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यावर भर देण्यात आला. गावातील प्रलंबित विकासकामे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांचे प्राधान्याने आणि टप्प्याटप्प्याने निराकरण करण्यासाठी महापालिका प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच शिवे–वाकी तर्फे वाडा येथील पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, "भामा-आसखेड प्रकल्प हा पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. शहराच्या पाणीपुरवठ्याला कोणत्याही परिस्थितीत बाधा येऊ न देता हा प्रकल्प नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येईल. त्याचवेळी या प्रकल्पासाठी मोलाचे योगदान दिलेल्या प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्या, प्रलंबित प्रश्न आणि गावाच्या विकासकामांकडेही संवेदनशीलतेने पाहून त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात येतील. शहराचा विकास आणि प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांचे हित या दोन्ही बाबींचा समतोल राखत प्रशासनामार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल."

## राजू दुर्गे यांची शहर भाजपच्या मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती

■ **पिंपरी (दै. संध्या)**

भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या संघटनात्मक बळकटीकरणासाठी आणि पक्षाची भूमिका जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी माजी नगरसेवक राजू दुर्गे यांची शहराच्या मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते दुर्गे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी पक्षाच्या वतीने त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी बोलताना शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले की, "राजू दुर्गे हे अभ्यासू, प्रभावी वक्ते आणि पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविणारे कार्यकर्ते आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, महापालिकेच्या माध्यमातून झालेल्या विकासकामांची प्रभावी मांडणी करणे तसेच विरोधकांच्या दिशाभूल करणाऱ्या प्रचाराला तथ्याधारित उत्तर देणे, ही जबाबदारी ते सक्षमपणे पार पाडतील.



त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाची भूमिका अधिक प्रभावीपणे जनतेसमोर मांडली जाईल." नियुक्तीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना राजू दुर्गे म्हणाले, "भाजप नेतृत्वाने आणि शहराध्यक्ष बापू काटे यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय जनता पक्षाची ध्येय-धोरणे, विकासाभिमुख विचारसरणी आणि शहरातील विकासकामे विविध प्रसारमाध्यमे तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करणार आहे."

## ७ मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांच्या खात्यात आर्थिक मदत जमा

■ **पिंपरी (दै. संध्या)**

मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून जलद गतीने सुरू आहे. महापौर रवि लांडगे यांच्या निर्देशानुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्यात येत असून, कागदपत्रांची पूर्तता झालेल्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. आतापर्यंत मृत अक्षय सावंत (वय ३५), सन्नी माने (वय ३९), राहुल गायकवाड (वय ३५), वामन कसबे (वय ३५), नागेश गायकवाड (वय २६), सुनील कोरके (वय ४०) आणि रणजीत पाटील (वय २२) यांच्या कायदेशीर वारसांच्या बँक खात्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत नियमानुसार थेट जमा करण्यात आली आहे. दुर्घटनेतील मृत भावेश वाणी आणि महेश कुंभार यांच्या कायदेशीर वारसांच्या कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नसल्याने त्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम जमा होऊ शकलेली नाही. संबंधित कागदपत्रे प्राप्त होताच आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या वारसांच्या खात्यातही नियमानुसार आर्थिक मदतीची रक्कम तातडीने जमा करण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

> मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात येत आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच पात्र वारसांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा केली जात आहे. उर्वरित लाभार्थ्यांची कागदपत्रे प्राप्त होताच त्यांनाही विलंब न लावता आर्थिक मदत वितरित करण्यात येईल.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

> मोशी दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना शक्य तितक्या लवकर आर्थिक दिलासा मिळावा, ही महानगरपालिकेची भूमिका आहे. कोणत्याही मृत कर्मचाऱ्याच्या वारसांना मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रशासनाला आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उर्वरित मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांची आवश्यक कागदपत्रे प्राप्त होताच नियमानुसार आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाईल.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

## १०० कोटी महसुलाचा टप्पा आता ५०० कोटींचे लक्ष्य

■ **पिंपरी (दै. संध्या)**

माहिती तंत्रज्ञान आणि भाषा सेवा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी फिडेल सॉफ्टटेकने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती करत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ₹१०० कोटी रुपये महसुलाचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. माहिती तंत्रज्ञान आणि भाषा सेवा यांच्या प्रभावी एकत्रीकरणातून कंपनीने उद्योगक्षेत्रात विश्वासार्ह स्थान निर्माण केले आहे. आता डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अँड क्लाऊड टेक्नॉलॉजी, एंटरप्राइझ सॉफ्टवेअर सोल्युशन्स, एआय अँड डेटा ॲनालीटीक्स तसेच जपान-इंडिया कन्सल्टिंग यांसारख्या विविध सेवा क्षेत्रा मध्येही फिडेल सॉफ्टटेक यशस्वीपणे कार्यरत आहे. तसेच कंपनीने सलग चौथ्या वर्षी भागधारकांसाठी २२.५ टक्के लाभांश जाहीर केल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष सुनील कुलकर्णी यांनी दिली. बुधवारी, पुणे येथे फिडेल सॉफ्टटेक कंपनीची वार्षिक सर्व साधारण सभा पार पडली. यावेळी व्यवस्थापकीय संचालक प्राची कुलकर्णी, संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राजक्ता कोटस्थाने, संगणक तज्ञ डॉ. दीपक शिकारपूर तसेच कंपनी सचिव स्नेहा रत्नपारखी आदी उपस्थित होते. सुनील कुलकर्णी यांनी सांगितले की, या कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय पुणे येथे असून पुण्यासह हैदराबाद, चेन्नई, दिल्ली आणि बेंगळुरू येथे कंपनीची कार्यालये आहेत.



फिडेल सॉफ्टटेक ची वार्षिक सभा संपन्न

भारताबाहेर जपान आणि अमेरिकेतही कंपनीचा विस्तार झाला आहे. ५०० हून अधिक व्यावसायिकांच्या सक्षम टीमच्या बळावर फिडेल सॉफ्टटेक जागतिक स्तरावरील ग्राहकांना दर्जेदार आणि नाविन्यपूर्ण सेवा पुरवत आहे.


येत्या काही वर्षांत कंपनी ₹५०० कोटी महसुलाचा टप्पा गाठेल. कंपनीची सातत्याने होत असलेली प्रगती आणि वाढता व्यवसाय यामुळे हे उद्दिष्ट निश्चितच पूर्ण होईल असा विश्वास कुलकर्णी यांनी व्यक्त केला. व्यवस्थापकीय संचालक प्राची कुलकर्णी यांनी सांगितले की, व्यवसाय वृद्धी बरोबरच फिडेल सॉफ्टटेकने कौशल्य विकास, स्टार्ट अप यांना मार्गदर्शन व सहाय्य, तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत सामाजिक बांधिलकी जपली आहे. बैठकीत कंपनीची महसुली वाढ, नफा आणि इतर प्रमुख आर्थिक निर्देशकांचा सविस्तर आढावा सादर करण्यात आला.

पुढील आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये विकासात्मक दृष्टिकोन समोर ठेवून प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे. यामध्ये यामध्ये अमेरिका, जपान - भारत व्यवसाय महसुलाची गती कायम ठेवणे. भारतातून ऑफ शोअर डिलिव्हरी वाढवताना अमेरिका - जपान मधील अधिग्रहणांना एकात्मिक जागतिक संस्थेमध्ये समाकलित करणे. एआय सक्षम सेवांची निर्मिती करताना महसूल करारांचा विस्तार करणे. विक्री आणि विपणन क्षमता मजबूत करणे. भारत - जपान कन्सल्टिंग आणि जीसीसी प्लॅटफॉर्म विकसित करून आर्थिक शिस्तीसह निवडक अधिग्रहणांच्या संधींचा पाठपुरावा करणे तसेच एकूण नफा वाढ करण्यासाठी धोरण तयार करणे अशी माहिती फिडेल सॉफ्टटेक कंपनीच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

## पुनर्विकासासाठी नगरसेवक संदीप वाघेरे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील भाटनगर (सर्वे क्र. १७, पिंपरी) येथील ३३ वर्षांहून अधिक जुन्या, मोडकळीस आलेल्या व धोकादायक पुनर्वसित इमारतींचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) मार्फत पुनर्विकास करण्यात यावा, यासाठी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवून या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने १९८७ ते १९९१ या कालावधीत भाटनगर येथे तत्कालीन झोपडपट्टीतील नागरिकांच्या पुनर्वसनासाठी १७ इमारती उभारल्या होत्या. या इमारतींमध्ये आजही शेकडो कुटुंबे वास्तव्यास आहेत. मात्र, तीन दशकांहून अधिक काळ लोटल्यानंतर या इमारती अत्यंत जीर्ण, मोडकळीस आलेल्या असून रहिवाशांच्या जीवित व मालमत्तेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. महापालिकेने केलेल्या Structural Audit मध्ये संबंधित इमारती राहण्यायोग्य नसल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. तथापि, विद्यमान नियमांमध्ये पुनर्वसित इमारतींच्या पुनर्विकासाबाबत स्पष्ट तरतूद नसल्याचे सांगत पुढील कार्यवाहीसाठी राज्य शासनाच्या निर्णयाची आवश्यकता असल्याचे संबंधित यंत्रणांनी नमूद केले आहे. नगरसेवक संदीप वाघेरे यांनी निवेदनात म्हटले आहे की, या इमारतींची परिस्थिती आज झोपडपट्टीपेक्षाही अधिक दयनीय झाली असून त्या प्रत्यक्षात 'Vertical Slum' मध्ये परिवर्तित झाल्या आहेत. संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक झालेल्या या इमारतींमध्ये राहणाऱ्या गोरगरीब कुटुंबांच्या जीविताला कायमस्वरूपी धोका निर्माण झाला आहे.



■ SRA मार्फत तातडीने प्रस्ताव सादर करण्याची मागणी

# पायाभूत सुविधा व आपत्कालीन सेवांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा आज बाबासाहेब त्रिभुवन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत नागरिकांच्या दैनंदिन सेवांशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांना मान्यता देण्यात आली.

पशुवैद्यकीय सेवा अखंडित ठेवणे, क्रीडा सुविधा व खेळाडूंना प्रोत्साहन, शहरातील पायाभूत सुविधांची दुरुस्ती, आपत्कालीन व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता तसेच शैक्षणिक व आरोग्य क्षेत्राशी निगडित विविध विषयांवर यावेळी निर्णय घेण्यात आले. सभेत पशुरुग्णालयातील पशुशल्यचिकित्सक, पशुवैद्यकीय अधिकारी, पॅरावेट कर्मचारी व इतर आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याच्या सेवेला नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. त्यामुळे पशुवैद्यकीय सेवा, प्राणिसंग्रहालयातील सेवा तसेच भटक्या प्राण्यांशी संबंधित अत्यावश्यक सेवा अखंडित सुरू राहण्यास मदत होणार आहे.

महापालिकेच्या विविध विभागांसाठी आवश्यक फर्निचर व साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच शहरातील रस्ते, बीआरटी रेलिंग, फुटपाथ दुरुस्ती आणि संबंधित पायाभूत सुविधांच्या कामांना मंजुरी देण्यात आली. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वार्षिक परीक्षेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच जलशुद्धीकरण केंद्रातील आपत्ती व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या पंपांच्या संचालन व देखभालीसाठी आवश्यक कार्यवाहीस मंजुरी देण्यात आली. वायसीएम रुग्णालयाच्या नव्याने उभारण्यात आलेल्या इमारतीस नामकरण करण्याचा प्रस्ताव महापालिका सभेकडे शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सार्वजनिक शौचालये व मुताऱ्यांची यांत्रिक पद्धतीने साफसफाई आणि देखभालीच्या कामास मान्यता देण्यात आली. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन विभागाच्या मदतीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या आपदा मित्र व ट्रेनी फायरमन यांच्या मानधनासाठी आवश्यक तरतूद करण्यासही मान्यता देण्यात आली.



आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध राहावे, यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील स्वच्छता, देखभाल व उद्यान व्यवस्थापनाच्या कामास मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे क्रीडा सुविधांची योग्य देखभाल होऊन खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध राहण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती निधीत वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करण्यासाठी आवश्यक खर्चास मंजुरी देण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे




### साऊथ झोन तायक्वांदो स्पर्धेत अभिनव पब्लिक स्कूलची दमदार कामगिरी

**वाघोली : दैनिक संध्या**

■ दोन सुवर्ण, दोन रौप्य, तीन कांस्य पदके; राष्ट्रीय स्पर्धेसाठी चार विद्यार्थ्यांची निवड

अभिनव पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सीबीएसई साऊथ झोन तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२६-२७ स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. ३१ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन कांस्य पदकांसह एकूण सात पदकांची कमाई केली, तर पाच विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेत ओमकार कवली आणि शिबम पाल यांनी सुवर्णपदक पटकावत विद्यालयाचा गौरव वाढविला. अनिश पवार आणि वैभव राठोड यांनी रौप्यपदक मिळविले, तर नरेश कुमार, समर्थ राठोड आणि रोहित राठोड यांनी कांस्यपदकाची कमाई केली. तसेच वेदांत डोंगरे, रुद्र उंद्रे, ज्ञानरंजन लेंका, शाश्वत कुटे आणि दीपक बाविस्कर यांनीही उल्लेखनीय खेळाचे प्रदर्शन करून आपली छाप पाडली. या स्पर्धेतील सुवर्ण व रौप्यपदक विजेते असे ओमकार कवली, शिबम पाल, अनिश पवार आणि वैभव राठोड यांची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण आहे. या यशामागे प्रशिक्षक सुरेश राठोड यांचे परिश्रम आणि मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनव चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक डॉ. आर. ए. मुलाणी यांनी खेळामुळे विद्यार्थ्यांच्या भावनिक कौशल्यांसह बुद्धिमत्तेचा विकास होत असल्याचे सांगितले. विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अश्विनी पानसरे यांनी खेळामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असल्याचे मत व्यक्त केले. उपप्राचार्या राजश्री गुजर, समन्वयक यशोदा गट्टीमी तसेच सर्व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### विमल विठ्ठल टिंगरे यांचे निधन

**कळसगाव : दैनिक संध्या**

कळसगाव येथील आदर्श माता श्रीमती विमल विठ्ठल टिंगरे वय 83 वर्षं यांचे वृद्धापकाळाने दुःख निधन झाले त्यांचे मागे एक मुलगा व पाच मुली, सुन, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. ॲमिन्युशन फॅक्टरीचे कामगार नेते गणेश टिंगरे यांच्या मातोश्री व आळंदी नगरपरिषद शिक्षण मंडळाचे मा.सभापती श्रीधर कुऱ्हाडे यांच्या सासूबाई होत्या.

### जिल्हा गुणवत्ता यादीत फाकटे शाळेचे पाच विद्यार्थी झळकले; आयुष केदारीची निवड

**कवठे येमाई : दैनिक संध्या**




शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फाकटे येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत जिल्हा गुणवत्ता यादीत आपले स्थान मिळविले आहे. नुकतीच जाहीर झालेल्या गुणवत्ता यादीत शाळेच्या तब्बल पाच विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली असून, गावासह संपूर्ण बेट भागातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गुणवत्ता यादीत मच्छिंद्र चाटे (२५६ गुण), रामप्रकाश वाळुंज (२५६ गुण), ईश्वरी बाबाजी शिंदे (२४४ गुण), आयुष नागेश केदारी (२३८ गुण) आणि शिवप्रसाद विकास भालेकर (२३६ गुण) यांनी यश मिळविले आहे. विशेष म्हणजे आयुष नागेश केदारी याची प्रतिष्ठेच्या जवाहर नवोदय विद्यालयासाठीही निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना श्री बाबाजी पोपट हिलाळ सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश डोके,तालुका गटशिक्षण अधिकारी डॉ. प्रितम कोकणे,शाळेच्या मुख्याध्यापिका प्रिया काळे, केंद्रप्रमुख गणेश काळे तसेच शिक्षणप्रेमी ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.फाकटे शाळेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दिशेने शाळेने आणखी एक मानाचा टप्पा गाठल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### चाकणला कचरा समस्येवर तोडगा

**चाकण : दैनिक संध्या**

चाकण येथील स्वप्ननगरी परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचल्यामुळे स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लगत होता. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांनी कचरा समस्येवर तातडीने तोडगा काढला आहे.  कचऱ्याच्या समस्येबाबत नागरिकांनी चाकण नगर परिषदेचे माजी नगरसेवक राहुलदादा किसनराव कांडगे यांच्याकडे कचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. चाकण मधील नागरिकांची ही अडचण समजताच क्षणाचाही विलंब न करता राहुलदादा कांडगे व नगरसेविका रूपालीताई राहुलदादा कांडगे यांनी तात्काळ नगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधून कचरा उचलण्याचे आदेश दिले. आरोग्य कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून कचरा उचलून परिसर स्वच्छ केला आहे. नागरिकांच्या हाकेला तत्परतेने धावून जाणाऱ्या रूपालीताई यांचे स्वप्ननगरी मधील नागरिकांनी कौतुक केले.

### शालेय व्यवस्थापन समितीवर अमोघ धाडगे

**चाकण : दैनिक संध्या**



जनता शिक्षण संस्थेच्या येथील श्री शिवाजी विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी येथील उद्योजक अमोघ नामदेव धाडगे यांची सर्वांनूमते बिनविरोध निवड करण्यात आली. प्रशालेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका बैठकीत व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी धाडगे यांना काम करण्याची संधी मिळाली. प्रशालेचे प्राचार्य अनिल ठुबे व आदर्श शिक्षक राजेंद्र खरमाटे यांच्या हस्ते धाडगे यांचा सन्मान करण्यात आला. चाकण प्रशालेत प्रतिवर्षी शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यात येते. त्यामध्ये विविध पदावर काम करण्याची संधी तरुणांना दिले जाते.

# “सायबर गुन्हे आणि अमली पदार्थांपासून दूर राहा”

■ सजग, जबाबदार नागरिक बना" – पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील

■ जेजुरीत जिजामाता विद्यालयात सायबर व अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न



■ **जेजुरी (दै. संध्या)**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी या विद्यालयात पुणे ग्रामीण पोलिस व  जेजुरी पोलीस स्टेशन यांच्या वतीने आयोजित सायबर व अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "सायबर गुन्हे आणि अमली पदार्थांपासून दूर राहा; सजग, जबाबदार नागरिक बना," असे आवाहन केले. त्यांनी सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी घ्यावयाची काळजी, ऑनलाइन फसवणूक टाळण्याचे उपाय तसेच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करून कायद्याचे पालन करणारे आदर्श नागरिक बनावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी जेजुरी पोलीस स्टेशनच्या सहायक पोलीस निरीक्षक दिपाली पवार, नामदेव तारडे  तसेच पोलीस हवालदार विनोद देशमुख यांनीही विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि अमली पदार्थांपासून दूर राहण्याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी "अमली पदार्थांना कायमचा नकार देऊ, व्यसनमुक्त आणि सुदृढ समाज घडविण्यासाठी प्रयत्न करू" अशी अमली पदार्थविरोधी सामूहिक प्रतिज्ञा घेतली. या प्रतिज्ञेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर चव्हाण यांनी प्रभावीपणे केले, तर डॉ. मधुसूदन जगताप यांनी उपस्थित मान्यवर, पोलीस अधिकारी, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होण्यास तसेच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती होण्यास निश्चितच मदत झाली.

कार्यक्रमाचे नियोजन जेजुरी पोलीस स्टेशनचे भूषण कदम, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, माध्यमिक विभाग प्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभाग प्रमुख किरण मोडक, सोमनाथ उबाळे,सोनबा दुर्गाडे, जयसिंग वसावे, गणेश भंडलकर, कैलास सोनवणे, महेश खाडे, कुलदीप साळवे, मयुर शिंदे, राजाराम पिसाळ, अजय जगताप, पांडुरंग आटोळे, राघू हारुळे, योगेश घोरपडे, राजेंद्र ताम्हाणे, पूनम बाठे, वैष्णवी धुमाळ, सारिका कामथे, प्राजक्ता क्षीरसागर यांनी केले.

## चाकण भागात विजेचा खेळखंडोबा

■ **चाकण (दै. संध्या)**

कोणतीही पूर्वसूचना न देता भारनियमनाच्या नावाखाली महावितरण कंपनी वीजपुरवठा खंडित करत आहे. चाकण पंचक्रोशीत दररोज विजेचा खेळ खंडोबा सुरू असल्याने वीजग्राहक त्रस्त झाले आहेत. चाकण शहर व परिसरात क्षणाक्षणाला बत्ती गुल होत असल्याने शेतकरी, महिला व विद्यार्थी मेटाकुटीला आले आहेत. वीज गायब होत असल्याने सर्वांनाच मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चाकण नगरपरिषद हद्दीतील वाडी - वस्तीवर सिंगल फेज वीजपुरवठा होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. कुट्टी मशीन, स्ट्रीट लाईट, दुध काढण्याच्या मशीन, पिठाच्या गिरण्या तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जाणारे विज पंप, यांसारखी अनेक उपकरणे बंद पडत असल्याने सर्वांनाच मनस्ताप सहन करावा लागत आहे.  दुग्ध व्यवसायावर विपरीत परिणाम होत असून शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. भविष्यात जर असा कोणताही भारनियमनाचा निर्णय घ्यायचा असेल, तर तो शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेऊन किंवा त्यांच्याशी सविस्तर चर्चा करूनच घ्यावा आणि त्यापूर्वी योग्य ती पूर्वकल्पना देण्यात यावी, अशी मागणी उद्योजक श्याम राक्षे यांनी केली आहे.

> “पावसाळ्याचे दिवस असल्याने पूर्ववत नियमित वीजपुरवठा सुरू ठेवणे अपेक्षित आहे. अन्यथा संतप्त नागरिकांकडून मोठा उद्रेक होऊ शकतो. वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.”
>
> **- सुवर्णाताई राक्षे, प्रथम उपनगराध्यक्षा, नगरपरिषद, चाकण.**

## उज्ज्वला शास्त्री तळेगावकर संस्कृत एम.ए. परीक्षेत प्रथम

■ साळवाडीच्या कन्येने गावासह संप्रदायाचा गौरव वाढविला

■ **कोरेगावमूळ (दै. संध्या)**



साळवाडी येथील उज्ज्वला शास्त्री तळेगावकर यांनी संस्कृत विषयातील एम.ए. परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे साळवाडी गावासह परिसर आणि संप्रदायाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. उज्ज्वला शास्त्री यांनी आध्यात्मिक साधनेसह संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास करत फैजपूर (जि. जळगाव) येथील श्रीचक्रधर गुरुकुल संस्कृत महाविद्यालयातून नागपूर विद्यापीठाच्या पाच वर्षांच्या अभ्यासक्रमांतर्गत शिक्षण पूर्ण केले. त्यांनी २०२२ मध्ये संस्कृत प्राज्ञ, संस्कृत विशारद आणि संस्कृत शास्त्री या पदव्या संपादन केल्या. यानंतर त्यांनी शिक्षणाची वाटचाल कायम ठेवत जालना जिल्ह्यातील अंबड येथील सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी महाविद्यालयातून संस्कृत विषयात बी.ए. पूर्ण केले. पुढे याच वर्षी त्यांनी संस्कृत विषयातील एम.ए. परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत आपल्या शैक्षणिक प्रवासात आणखी एक मानाचा टप्पा गाठला. त्यांच्या या यशामागे कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि संघर्षाची मोठी साथ असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रवासात प्रा. भारतभूषण शास्त्री यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच गुरुजन, समाजातील ज्येष्ठ व्यक्ती आणि हितचिंतकांचे आशीर्वादही लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. उज्ज्वला शास्त्री या उत्कृष्ट वक्त्याही असून विविध ठिकाणी त्यांची धार्मिक व आध्यात्मिक प्रवचने झाली आहेत. त्यांच्या अनेक व्याख्यानांचे ध्वनिचित्रफिती समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत. त्यांच्या या यशाबद्दल साळवाडी परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या यशाने गावासह संपूर्ण संप्रदायाचा गौरव वाढल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## तांदळीतील भूमिपूजन फलकाची मध्यरात्री तोडफोड

■ संतप्त नागरिकांची कठोर कारवाईची मागणी

■ **कवठे येमाई (दै. संध्या)**




शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील तांदळी गावातील मळई रस्ता विकासकामाच्या भूमिपूजनासाठी उभारण्यात आलेल्या फलकाची अज्ञात समाजकंटकाने मध्यरात्री वाकवून तोडफोड केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सार्वजनिक मालमत्तेची जाणीवपूर्वक हानी केल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून,दोषींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.या प्रकरणी तांदळी ते म्हसोबावाडी रस्त्याचे काम करणारे कॉन्ट्रॅक्टर ऋषिकेश निंबाळकर यांनी शिरूर पोलिसांत रीतसर तक्रार दाखल केली आहे. सदर मळई रस्ता विकासकाम हे शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर (माउली आबा) कटके यांच्या विकास निधीतून मंजूर झाले असून, नुकतेच या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. मात्र, विकासकामाला गालबोट लावण्याच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तींनी भूमिपूजन फलकाची तोडफोड करून नुकसान केल्याचा आरोप केला जात आहे.

या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली असून, सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे व अत्याधुनिक तपास यंत्रणेच्या मदतीने आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ व नागरिकांकडून करण्यात आली आहे.सार्वजनिक विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या व सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणाऱ्या समाजकंटकांवर पोलिसांनी कठोर कारवाई करून अशा प्रवृत्तींना आळा घालावा,अशीही मागणी जोर धरत आहे.


## जेजुरीत भाजपाच्या वतीने खासदार संजय राऊत यांचा जाहीर निषेध




■ **जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या बाबत अर्वाच्य भाषेत खासदार संजय राऊत यांनी शिवीगाळ केल्याच्या निषेधार्थ पुणे जिल्हा भाजपा युवा मोर्चा, व जेजुरी शहर भाजपाच्या वतीने जेजुरी येथे जाहीर निषेध करण्यात आला. जेजुरी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुरुवार दिनांक 6 रोजी सकाळी पुणे जिल्हा भाजपा व जेजुरी शहर भाजपाच्या वतीने  भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव श्रीकांत ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार संजय राऊत यांच्या विरोधात निषेध सभा घेण्यात आली. यावेळी खासदार संजय राऊत यांच्या पोस्टरवर निषेध म्हणून जोडे मारण्यात आले. खासदार संजय राऊत यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा यासाठी यावेळी जेजुरी पोलिसांना निवेदन देण्यात आले. पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्यास आठ दिवसात जेजुरी येथे राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको करण्याचा इशारा यावेळी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव श्रीकांत ताम्हाणे यांनी दिला.

## चाकणला मंगळवारी रंगणार सावतामाळी महाराज संजीवन समाधी सोहळा



■ **चाकण (दै. संध्या)**

चाकण येथे मंगळवारी (दि.११) श्री संत सावतामाळी महाराज संजीवन समाधी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्त भरगच्च अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संत शिरोमणी सावतामाळी महाराज संजीवन समाधी सोहळा समितीच्या वतीने वरील नियोजित दिवशी विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. चाकण येथील चक्रेश्वर मंदिरालगतच्या श्री संत सावतामाळी महाराज मंदिरात मंगळवारी होणाऱ्या या कार्यक्रमाची जोरदार तयारी करण्यात आल्याची माहिती अमोघ धाडगे व सतीश धाडगे यांनी दिली. सोहळ्याच्या दिवशी सकाळी सात वाजता श्रींचा अभिषेक होणार आहे. त्यानंतर माळ आळीतील श्री संत सावतामाळी मंदिरा पासून चक्रेश्वर मंदिरापर्यंत श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे हभप. मुकुंद महाराज चौधरी व विद्यार्थ्यांची दिंडी व प्रतिमा मिरवणूक काढण्यात येणार आहे.  सकाळी अकरा ते एक या वेळात राणूबाईमळा येथील जय गणेश महिला भजनी मंडळ व झित्राई माता महिला भजनी मंडळ यांचा सांप्रदायिक भजनाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी दोन वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून येथील उद्योजक अनिकेत केदारी यांनी महाप्रसादासाठी रोख बावीस हजार रुपये दिले आहेत.




# भर पावसात पोस्टाची सेवा

■ **आळंदी (दै. संध्या)**

**आळंदीतील पोस्ट कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीचा प्रश्न ऐरणीवर**

आळंदी शहरातील पोस्ट कार्यालयाच्या स्वतंत्र जागेचा प्रश्न तब्बल ५० वर्षांपासून प्रलंबित असल्याने नागरिकांना आजही अत्यंत गैरसोयीच्या परिस्थितीत टपाल सेवा घ्यावी लागत आहे. भर पावसात रस्त्यावर उभे राहून व्यवहार करावे लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

प्रदक्षिणा मार्गावरील सोमवंशीय क्षत्रिय कासार धर्मशाळेतील अवघ्या १० बाय १० फूटांच्या खोलीत आणि एका खिडकीतून हे पोस्ट कार्यालय कार्यरत आहे. व्यवहारासाठी ग्राहकांना खिडकीपाशी रांगेत उभे राहावे लागते. कार्यालयाबाहेर ऊन, वारा आणि पावसापासून संरक्षणासाठी कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांना रस्त्यावरच ताटकळत उभे राहावे लागते. बसण्यासाठी बाकांसारख्या मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याची तक्रार नागरिकांनी केली. या प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत आळंदी शहर शिवसेनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. पोस्ट कार्यालयासाठी आरक्षित जागा उपलब्ध असूनही केंद्रीय टपाल विभागाने स्वतंत्र इमारत उभारण्यासाठी कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसल्याचे शहरप्रमुख राहुल चव्हाण यांनी सांगितले. हा प्रश्न तातडीने निकाली न काढल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनीही या प्रश्नाची दखल घेत पुणे विभागाच्या पोस्टमास्टर जनरल प्रीती अग्रवाल यांना निवेदन सादर करून आळंदी पोस्ट कार्यालयासाठी स्वतंत्र इमारतीची मागणी केली आहे. आळंदी हे लाखो वारकरी भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान असून वर्षभर तसेच आषाढी व कार्तिकी वारीदरम्यान येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे या धार्मिक नगरीत आधुनिक सुविधांनी सुसज्ज स्वतंत्र पोस्ट कार्यालयाची उभारणी करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे

## राज्यव्यापी लोकचळवळ उभारणार : पुराणिक

बीड : बालविवाह रोखण्यासाठी केवळ कायदेशीर कारवाई नव्हे, तर लोकसहभागावर आधारित राज्यव्यापी लोकचळवळ उभारून १२ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक यांनी दिली. त्यांच्या अध्यक्षतेखाली बीड येथे बाल हक्कांशी संबंधित प्रकरणांची सुनावणी तसेच विविध विभागांची आढावा बैठक पार पडली. सुनावणीदरम्यान १९ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली असून त्यापैकी १० प्रकरणे निकाली काढण्यात आली. उर्वरित प्रकरणांमध्ये संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश आयोगाने दिले. “प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्यूअर” या तत्त्वानुसार भविष्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि कायदेशीर समस्या टाळण्यासाठी बालविवाह होण्यापूर्वीच प्रभावी उपाययोजना राबविण्याचा निर्धार आयोगाने व्यक्त केला. यासाठी १२ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींचे सक्षमीकरण, जीवनकौशल्य शिक्षण, कायदेशीर जनजागृती, पालकांचे प्रबोधन, शाळा-महाविद्यालयांचा सहभाग, ग्रामपंचायती, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून राज्यव्यापी लोकसहभागाची चळवळ उभारण्यात येणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. बैठकीत विविध विभागांमधील समन्वय अधिक बळकट करणे, बाल संरक्षणाशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि प्रत्येक गावात जनजागृती वाढविण्यासाठी संयुक्त कृती आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला.

## पद्मश्री डी. वाय. पाटील कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

कोल्हापूर : राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे व सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी पद्मश्री डी. वाय. पाटील कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातही पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे योगदान अतुलनीय होते. त्यांचे शेतीवर विशेष प्रेम असल्यामुळे ते शेवटपर्यंत बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत होते. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने राज्याचे मोठे नुकसान झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी राज्यातील शेतकरी बांधवांच्यावतीने पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, गेल्या सात दशकांहून अधिक काळ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान अजरामर आहे. त्यांच्या कार्याचा लाभ तीन-चार पिढ्यांनी घेतला असून त्यांच्या जाण्याने शिक्षण क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. शिक्षण, सामाजिक, वैद्यकीय आणि सार्वजनिक क्षेत्रात त्यांनी उभारलेला वारसा प्रेरणादायी आहे, असे सांगून त्या पुढे म्हणाल्या, लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांचे अनुभव, मार्गदर्शन आणि सूचनांचा अनेकांना लाभ झाला. राजकारणाच्या पलीकडे जाऊन त्यांनी जपलेली माणुसकी आणि समाजहिताची भूमिका कायम स्मरणात राहील. त्यांच्या कुटुंबियांनी हा समृद्ध वारसा समर्थपणे पुढे नेला असून तो भविष्यातही अधिक बळकट होईल. मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, पद्मश्री डी.वाय.पाटील यांच्या निधनाने देशासह राज्यात पोकळी निर्माण झाली आहे.

## नाट्यगृहाच्या कामांचा पालकमंत्र्यांकडून आढावा

यवतमाळ : शहरातील महात्मा ज्योतिबा फुले नाट्यगृह सर्वसामान्य नागरिकांसाठी लवकरात लवकर खुले करण्याच्या दृष्टीने पालकमंत्री संजय राठोड यांनी आज आढावा बैठक घेतली. नाट्यगृहातील प्रलंबित कामे, आवश्यक निधी आणि उर्वरित कामांचा सविस्तर आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेहेत्रे, यवतमाळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पालकमंत्री संजय राठोड यांनी नाट्यगृहासाठी आतापर्यंत झालेला खर्च, उपलब्ध निधी तसेच उर्वरित कामांसाठी आवश्यक आर्थिक तरतुदीची माहिती घेतली.

# ‘मुंबई सर्जनशील अर्थव्यवस्थेचे जागतिक केंद्र बनेल’

■ मुंबई (दै. संध्या)

भारताला सर्जनशील अर्थव्यवस्थेचे (क्रिएटर इकॉनॉमी) जागतिक केंद्र बनविण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे. गोरेगाव येथील फिल्मसिटी परिसरातील प्राइम फोकसच्या नव्या अत्याधुनिक स्टुडिओमुळे या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले असून, मुंबई सर्जनशील उद्योगांचे जागतिक केंद्र म्हणून अधिक सक्षम होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



फिल्मसिटी परिसरात प्राइम फोकसच्या जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक स्टुडिओच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, केंद्रीय माहिती व प्रसारण विभागाचे सचिव चंचल कुमार, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, दादासाहेब फाळके चित्रपट नगरी (फिल्मसिटी) च्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे – पाटील तसेच प्राइम फोकस समूहाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबईत जागतिक दर्जाची सुविधा उभारून जगभरातील मनोरंजन आणि सर्जनशील उद्योगांना सेवा देण्याचा प्राइम फोकसचा संकल्प आज प्रत्यक्षात उतरला आहे. शासनाने हा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य केल्याचे सांगून ‘वेव्ह्स 2025’ परिषदेदरम्यान झालेल्या सामंजस्य करारानंतर अवघ्या एका वर्षात या प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला, ही उल्लेखनीय बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासामध्ये असंख्य प्रेरणादायी कथा दडलेल्या आहेत. या कथा जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सक्षम सर्जनशील परिसंस्थेची गरज आहे. प्राइम फोकसची ही सुविधा त्या दृष्टीने देशासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

जगातील सर्वात मोठ्या चित्रपट सहनिर्मिती प्रकल्पांपैकी एक असलेल्या ‘रामायण’ चित्रपटाची निर्मिती या स्टुडिओमध्ये होत असल्याचा विशेष उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या चित्रपटाच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. भारतीय सर्जनशीलतेचा जागतिक स्तरावरील उत्कृष्ट नमुना म्हणून हा चित्रपट ओळखला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

युवा पिढीच्या सर्जनशील क्षमतेला वाव देणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे आणि मनोरंजन उद्योगासाठी सक्षम परिसंस्था उभारणे यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. फिल्मसिटीचे जागतिक दर्जाच्या सर्जनशील आणि मनोरंजन केंद्रामध्ये रूपांतर करण्याचा व्यापक पुनर्विकास आराखडाही लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी प्राइम फोकसच्या उपक्रमाचे कौतुक करताना, संस्कृती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा प्रभावी संगम या प्रकल्पातून साकार झाल्याचे सांगितले. सांस्कृतिक कार्य तसेच माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इलेक्ट्रॉनिक्स या दोन्ही विभागांची जबाबदारी स्वीकारल्यानंतर प्राइम फोकसच्या या परिसरात संस्कृती आणि तंत्रज्ञान एकत्र येऊन समाजासाठी मूल्यनिर्मिती करणारे आदर्श उदाहरण पाहायला मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. ‘रामायण’ चित्रपटाच्या ट्रेलरचा उल्लेख करताना मंत्री ॲड. शेलार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘ऑरेंज इकॉनॉमी’च्या संकल्पनेला प्राइम फोकसने प्रत्यक्ष आकार देण्याचे काम केले असल्याचे सांगितले. सर्जनशीलता, सांस्कृतिक समृद्धी आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून देशासाठी नवे मानदंड निर्माण करणाऱ्या या उपक्रमासाठी त्यांनी प्राइम फोकसच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यात सर्जनशील उद्योगांना नवी चालना मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी ‘वेव्ह्स 2025’ परिषदेदरम्यान महाराष्ट्र शासन आणि प्राइम फोकस यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराचा उल्लेख करत त्या कराराचेच हे फलित असल्याचे सांगून या माध्यमातून मुंबईत जागतिक दर्जाची सुविधा उभी राहिल्याचे नमूद केले. भारताकडे सर्जनशील आणि क्रिएटर इकॉनॉमी क्षेत्रात जगातील सर्वाधिक प्रतिभा, कल्पकता आणि समृद्ध कथाकथन परंपरा असल्याचे सांगून त्यांनी या सामर्थ्याच्या बळावर भारताला ऑरेंज इकॉनॉमीमध्ये जागतिक नेतृत्व मिळविण्याची क्षमता असल्याचा विश्वास व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने अल्पावधीत आवश्यक मंजुरी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे हा प्रकल्प साकार होऊ शकल्याचे त्यांनी सांगितले. ‘वेव्ह्स 2025’ दरम्यान जाहीर झालेल्या इतर गुंतवणूक आणि विकासविषयक वचनबद्धताही लवकरच प्रत्यक्षात उतरून त्याचा लाभ देशाच्या अर्थव्यवस्थेला होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्राइम फोकसचे नमित मल्होत्रा यांनी मनोगतात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र शासन आणि फिल्मसिटी प्रशासनाच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मुंबईतील हा प्रकल्प प्राइम फोकसचे जागतिक मुख्यालय असून भारतीय म्हणून आणि मुंबईकर म्हणून तो अभिमानाचा विषय असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत जगातील सर्वोत्तम दर्जाची सुविधा उभारण्याचा संकल्प करण्यात आला आणि राज्य शासनाच्या पाठबळामुळे तो प्रत्यक्षात साकार झाला असल्याचे त्यांनी सांगितले. प्राइम फोकसच्या पहिल्या टप्प्याच्या यशानंतर दुसरा टप्पाही लवकरच पूर्ण करून भारताला जागतिक मनोरंजन आणि सर्जनशील उद्योग क्षेत्रात अग्रस्थान मिळवून देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनीही प्राइम फोकसच्या जागतिक दर्जाच्या सुविधेचे कौतुक करताना, ‘वेव्ह्स 2025’ परिषदेदरम्यान झालेल्या सामंजस्य करारानंतर अल्पावधीत हा प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाल्याचे सांगितले. नमित मल्होत्रा आणि त्यांच्या संपूर्ण चमूने उभारलेली ही सुविधा केवळ देशातीलच नव्हे तर जगातील सर्वोत्तम सर्जनशील सामग्री निर्मिती केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमापूर्वी फिल्मसिटीच्या प्रशासकीय कार्यालय परिसरातील दादासाहेब फाळके यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्याचबरोबर एक पेड माँ के नाम अंतर्गत वृक्षारोपण केले.

# रंगरंगुल्या, सानसानुल्या गवतफुला रे गवतफुला..!
## रत्नागिरीतील सड्यांवर रानफुलांचा रंगोत्सव..

**हिरवी नाजुक रेशिम पाती, दोन बाजूनी सळसळती नीळ नीळुली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती कवयित्री इंदिरा संत यांच्या कवितेच्या या ओळी वाचताना डोळ्यांसमोर जो निसर्गाचा विलोभनीय कॅनव्हास उभा राहतो, तोच कॅनव्हास सध्या रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक गावांमधील सड्यांवर प्रत्यक्षात अवतरला आहे. पावसाच्या अधून-मधून बरसाणाऱ्या सरी ओसरल्यावर, इथल्या तांबड्या मातीच्या सड्यांनी जणू हिरवा शालू नेसला आहे. त्यावर विलोभनीय रानफुलांची रंगीबेरंगी ‘वेलबुट्टी’ साकारली आहे.**

साताऱ्याचे ‘कास पठार’ आणि कोल्हापूरचे ‘मसाई पठार’ यांनी आजवर आपल्या रानफुलांच्या सौंदर्याने पर्यटकांना भुरळ घातली आहे. पण, आता रत्नागिरी परिसरातील सडेही “आम्ही देखील पाठीमागे नाही, येवा आमचो सौंदर्य न्याहाळा!” अशी प्रेमळ साद पर्यटकांना घालत आहेत. साडवली, जैतापूर, देवाचे गोठणे, नाटे अशा २० ते २२ हून अधिक सड्यांवर सध्या निसर्गाने विविध रंगांच्या रानफुलांची अक्षरशः उधळण केली आहे.

या सड्यांवर सध्या दीपकाडी, कंदीलपुष्प, कुमुदिनी, रानहळद, विविध प्रकारच्या अमरी, चोहळा, परजीवी वाढणारे आकर्षक तुरे, केना अशा कितीतरी रानफुलांनी बहर आणला आहे.

‘सह्याद्री संकल्प सोसायटी’चे कार्यकारी संचालक प्रतीक मोरे या सौंदर्याविषयी सांगताना म्हणतात, “साडवलीच्या सड्यावर एकदांडी (Dipcadi concanense) ही कंदवर्गीय वनस्पती सध्या फुलली आहे.या प्रजातीचा ‘देवरुखेन्स’ हा एक नवा वाणही समोर आला आहे. पावसाळ्यातील एक-दोन महिने आपले मनमोहक रूप दाखवून या वनस्पती पुन्हा जमिनीत सुप्तावस्थेत जातात.”

चोहळा – ओहोळांच्या कडेला वाढणारी ‘चोहळा (Curcuma scaposa) ही आलेवर्गीय वनस्पती सध्या निसर्गाच्या कुशीत फूलली आहे. औषधी गुणधर्म असलेली ही वनस्पती आता दुर्मिळ आणि धोकाग्रस्त प्रजातींमध्ये मोडते.

गुलाबी कापरी कमळ (Cleome angulata) – जैतापूर, नाटे आणि धाऊलवल्ली अशा १० ते १२ गावांच्या परिसरातील सड्यांवर ‘कापरी कमळ’ पाहायला मिळते. डॉ. अरुण चांदोरे आणि डॉ. श्रीरंग यादव यांनी शोधून काढलेली ही वनस्पती अतिशय सुंदर आहे. तिला पाणतिळवण असेही म्हणतात. तिची नाजूक गुलाबी फुले वाऱ्यावर डोलताना पाहून त्या आकर्षक सौंदर्यात हरवायला होतं. ती डोलताना कापत असल्याचा भास होतो. एकाचवेळी ताटवे फूलल्याने संपूर्ण सडे गुलाबी रंगात न्हाऊन निघाले आहेत.

गुलाबी भुईचक्र – वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रताप नाइकवडे सांगतात, साडवली आणि आंबोलीच्या सड्यावर (Iphigenia devrukhensis) म्हणजेच ‘गुलाबी भुईचक्र’ ही वनस्पती आढळते. दीपकाडीच्या आधी फूलणारी ही अतिशय सुंदर फुले, सड्यावर जणू एक गुलाबी चादरच अंथरतात. तिला तिची एक वेगळी आणि स्वतंत्र ओळख आता प्राप्त झाली आहे.हे सौंदर्य केवळ पाहण्यासाठी नाही, तर जपण्यासाठीही आहे. याच उद्देशाने सह्याद्री संकल्प सोसायटीतर्फे गेली अनेक वर्षे ‘फुलोत्सव’ साजरा केला जात आहे. यातून विद्यार्थ्यांना या नैसर्गिक अधिवासाची आणि फुलांची शास्त्रीय माहिती दिली जाते. या सड्यांची आणि दुर्मिळ रानफुलांची जपणूक करणे ही आता आपल्या सर्वांचीच सामूहिक जबाबदारी बनली आहे.

निसर्गाचे हे अद्भुत आणि निखळ सौंदर्य डोळे भरून पाहताना, मनातील कोलाहल शांत होतो आणि मलाही वाटे लहान होऊन, तुझ्याहून ही लहान रे तुझ्या संगे सडा रहावे, विसरुन शाळा, घर सारे ओठांवर सहजच या ओळी रेंगाळू लागतात..





प्रशांत कुसुम आनंदराव सातपुते
जिल्हा माहिती कार्यालय, रत्नागिरी

# युवकांनी नाविन्यपूर्ण उद्योग उभारणीवर भर द्यावा

नांदेड, दि. ५ ऑगस्ट : राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी युवक-युवतींनी पारंपरिक व्यवसायाबरोबरच नाविन्यपूर्ण उद्योग प्रकल्प उभारण्यावर भर द्यावा. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या माध्यमातून अधिकाधिक युवक, महिला आणि नवउद्योजकांना उद्योग स्थापनेसाठी प्रोत्साहन देऊन त्यांना आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिले.

जिल्हा उद्योग केंद्र नांदेड येथे आयोजित बैठकीत जिल्हा उद्योग केंद्र आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेताना तसेच उद्योजकांच्या समस्या जाणून घेताना ते बोलत होते.

यावेळी आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार आनंदराव बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राजाराम गुठळे, विविध विभागांचे अधिकारी तसेच जिल्ह्यातील उद्योजक उपस्थित होते.

बैठकीत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेत पात्र लाभार्थ्यांची कर्ज मंजुरी, अनुदान वितरण, प्रशिक्षण आणि उद्योग मार्गदर्शनाची प्रक्रिया अधिक गतिमान करण्याच्या सूचना मंत्री डॉ. सामंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्ह्यात नवउद्योजकांची संख्या वाढविण्यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत शासनाचा लाभ पोहोचविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

औद्योगिक वसाहतींमधील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने हाती घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, सांडपाणी व्यवस्थापन, अग्निशमन सुविधा आणि इतर मूलभूत सेवा उद्योगांना वेळेत उपलब्ध झाल्यास नवीन गुंतवणूक आकर्षित होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी औद्योगिक वसाहतींमधील अग्निशमन सेवा शुल्क प्रति चौरस मीटर १ रुपया ७० पैसे करण्याची माहिती दिली. तसेच उद्योजकांना यापुढे दुहेरी कर भरावा लागणार नसून, चालू महिन्यापासून केवळ एकच एमआयडीसी कर आकारण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्याचे आदेशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. एमआयडीसी परिसरातील विद्युत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक प्रस्ताव लवकरच मंजूर करण्यात येणार असल्याचे सांगून, प्रलंबित विकासकामे आणि उद्योगसंबंधित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश त्यांनी दिले. उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक आणि समन्वयात्मक भूमिका घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान उद्योजकांनी औद्योगिक वसाहतींमधील विविध समस्या, पायाभूत सुविधांतील त्रुटी, वीज, पाणीपुरवठा, करप्रणाली आणि प्रशासकीय प्रक्रियेसंदर्भातील अडचणी मांडल्या. त्यावर मंत्री डॉ. सामंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करून प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. जिल्हा उद्योग केंद्र आणि एमआयडीसी यांनी परस्पर समन्वयाने कार्य करून उद्योजकांना सुलभ, पारदर्शक आणि वेळेत सेवा उपलब्ध करून द्याव्यात.

# पायाभूत सुविधा, रेल्वे आणि केंद्र सरकारच्या जमिनींवरील प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्मक

■ मुंबई (दै. संध्या)

**मिठागरांच्या (सॉल्ट पॅन)जमिनींबाबत निर्णय घेताना पर्यावरणतज्ज्ञ व स्थानिकांना विश्वासात घेणे गरजेचे असल्याचे सांगत, या जमिनी राज्य सरकारकडे हस्तांतरित झाल्यास तिथे प्रकल्पग्रस्त, बेघर, गिरणी कामगार व वंचितांसाठी परवडणारी घरे उभारण्याची मागणी अहिर यांनी केली. दिल्ली दौऱ्यादरम्यान उपसभापती अहिर यांनी केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकाराने आयोजित आरोग्यविषयक कार्यक्रमात भाग घेतला. तसेच आयुष मंत्रालयाच्या योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांना व्हावा यासाठी त्याचा प्रचार प्रसार अधिक व्हावा, अशी सूचना केली. तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली यूपीएससी आणि एमपीएससी परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. या शिष्टमंडळात उपसभापती सचिन अहिर यांच्यासोबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, खासदार संजय पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार श्रीरंग बारणे आदी लोकप्रतिनिधी उपस्थित होते.**

मुंबईतील केंद्र सरकारच्या अखत्यारीतील जमिनींवरील प्रलंबित पुनर्विकास प्रकल्प, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जमिनीवरील रखडलेले प्रकल्प, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वेच्या जमिनी, मिठागरांचा (सॉल्ट पॅन) विकास आणि पायाभूत सुविधांच्या विविध प्रश्नांवर महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळासोबत नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. उपसभापतीपदी निवड झाल्यानंतर सचिन अहिर यांचा हा पहिलाच दिल्ली दौरा होता. याबाबत त्यांनी विधान भवन येथील विधिमंडळ पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.

उपसभापती सचिन अहिर यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासह खासदारांच्या शिष्टमंडळासोबत लोकसभेचे अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची सदिच्छा भेट घेतली. त्यानंतर त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, वाणिज्य मंत्री पियुष गोयल, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह, बंदरे व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेऊन मुंबई व महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली. गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या बैठकीत, मुंबईतील राज्य व केंद्र सरकारच्या जमिनींवरील पुनर्विकासासाठी वेगवेगळ्या नियमांमुळे अडचणी येत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. संपूर्ण शहरासाठी एक पुनर्विकास धोरण असावे, अशी मागणीही त्यांनी केली. कुलाबा, बॅलार्ड पिअर परिसरातील हजारो झोपड्या व मोडकळीस आलेल्या सेस इमारतींचा पुनर्विकास एनओसीअभावी रखडला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी लवकरच स्वतंत्र उच्चस्तरीय बैठक घेण्याचे निश्चित झाले.रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी झालेल्या चर्चेत सावंतवाडी रोड रेल्वे स्थानकातील सुविधांसह मुंबई उपनगरीय रेल्वेतील महालक्ष्मी आणि प्रभादेवी स्थानकांच्या उन्नतीकरणाबाबत लवकरच महत्त्वाची बैठक होणार असल्याचे आश्वासन रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्याचे अहिर म्हणाले. वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्याशी सूतगिरण्यांमधील उत्पादन व कामगारांच्या थकीत वेतनावर अर्धा तास चर्चा झाली. एनटीसीच्या ताब्यातील बंद गिरण्यांच्या जमिनी कामगारांच्या पुनर्वसनासाठी ‘म्हाडा’कडे हस्तांतरित करण्याबाबत आणि चाळीतील रहिवाशांच्या पुनर्वसनावर सकारात्मक चर्चा झाली. हा विषय केंद्रीय मंत्रिमंडळासमोर मांडण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जेजुरीतील जिल्हा परिषद शाळेला श्री मार्तंड देवसंस्थानकडून संगणक संचांची भेट

**जेजुरी : दैनिक संध्या**

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळावी या उद्देशाने जेजुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जुनी जेजुरी येथे श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने तीन संगणक संच भेट देण्यात आले. श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे यांच्या हस्ते हे संगणक संच शाळेला प्रदान करण्यात आले. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाचा लाभ मिळावा, संगणक साक्षरता वाढावी आणि भविष्यातील स्पर्धात्मक युगात त्यांना सक्षम बनविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याचे यावेळी विश्वस्त पांडुरंग थोरवे यांनी सांगितले. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचा अधिक प्रभावी लाभ मिळणार असून संगणक शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमाबद्दल शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी श्री मार्तंड देवसंस्थानचे आभार व्यक्त केले.

### माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांच्या हस्ते शनिवारी विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**पुणे : दैनिक संध्या**

■ लिंगायत गवळी विकास फाउंडेशनचा शनिवारी, राज्यस्तरीय समाज गौरव पुरस्कार सोहळा

लिंगायत गवळी विकास फाउंडेशन, पुणे या संस्थेच्या वतीने शनिवारी, पिंपरी येथे माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री व राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या हस्ते राज्यस्तरीय समाज गौरव पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तसेच विद्यार्थी गुणगौरव व करिअर मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार आहे अशी माहिती संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्रा. संभाजी बारसे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. शनिवारी, (दि. ८ ऑगस्ट) सकाळी ११ वाजता, संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे कार्यक्रम सुरू होईल. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच राज्यातील प्रतिष्ठित बंधू-भगिनींचा "समाज गौरव पुरस्कार - २०२६" देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हिरामण गवळी, कार्यकारी अध्यक्ष वसंत नामागवळी तसेच धाराशिव येथील प्रा. भालचंद्र हुच्चे, खंडू बहिरवाडे, नाशिक येथील ज्येष्ठ समाजसेवक उमाकांत जोमीवाले, पिंपरी चिंचवड नगरसेविका अरुणाताई लंगोटे, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, प्रदेश युवक अध्यक्ष प्रवीण हुंडीवाले, चाळीसगाव येथील सुपाआप्पा पिरनाईक, अक्कलकोट येथील डॉ. किसन झिपरे, सोलापूर येथील सुरेश शहापूरकर, धुळे येथील बंटीभाऊ घुगरे, जळगाव येथील कृष्णभाऊ गठरी, नाशिकचे सोमनाथ हिरणवळे, पुण्यातील उद्योजक भगवान औशीकर, प्रदेश उपाध्यक्ष सोलापूर अनिल नायकू आदी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती कार्यकारणी सदस्य प्रकाश चौधरी, वामन काटकर, मधुकर बिडकर, राजेश चौधरी यांनी दिली आहे. या कार्यक्रमास पुणे, पिंपरी चिंचवड मधील सर्व समाज बंधू, भगिनींनी उपस्थित रहावे असेही आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



### शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी राहुल टेंगले यांची बिनविरोध निवड

**यवत : दैनिक संध्या**

राहू (ता. दौंड): जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राहू (ता. दौंड, जि. पुणे) येथील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्री. राहुल टेंगले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी सौ. स्वातीताई वाईकर यांचीही निवड करण्यात आली. ही निवड सर्व पालक, ग्रामस्थ आणि शिक्षकांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शालेय शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांचा अनुभव आणि शैक्षणिक कार्यातील सक्रिय सहभाग यामुळे श्री. राहुल टेंगले यांच्या नेतृत्वाखाली शाळेचा सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. नवनिर्वाचित अध्यक्षांनी शाळेच्या विकासासाठी शैक्षणिक व भौतिक सुविधा अधिक सक्षम करणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासह नियमित उपस्थितीवर विशेष भर देणे तसेच शाळा, पालक आणि ग्रामस्थ यांच्यात अधिक प्रभावी समन्वय निर्माण करणे, हे आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. या निवडीबद्दल ग्रामस्थ, पालक आणि शिक्षक वर्गाकडून श्री. राहुल टेंगले व सौ. स्वातीताई वाईकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका खाडे मॅडम, केंद्रप्रमुख राहुल वाघ, चिमाजी बापू कुल, सरपंच दिलीप देशमुख, संजय कुल, शरद शिंदे, दत्तात्रय केदारी, शरद नवले आदी मान्यवर उपस्थित होते.

### डॉ.शर्वरी इनामदार यांची कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड

**पुणे : दैनिक संध्या**



छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत डॉ. शर्वरी इनामदार यांनी उल्लेखनीय कामगिरी करत पाच नवीन राष्ट्रीय विक्रमांची नोंद केली. आठ सुवर्णपदके जिंकत त्यांनी स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. या स्पर्धेतून त्यांची सप्टेंबर २०२६ मध्ये कॅनडातील विनीपेग येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टिंग आणि बेंचप्रेस स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. देशभरातील विविध राज्यांतील सुमारे ८०० हून अधिक खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. मास्टर-१, ५७ किलो महिला गटातील क्लासिक प्रकारात डॉ. इनामदार यांनी स्क्वॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्टमध्ये एकूण ३६७.५ किलो वजन उचलले. तसेच इक्विप्ड प्रकारात त्यांनी विक्रमी ४२२ किलो वजन उचलून पाच नवीन राष्ट्रीय विक्रमांची नोंद केली. या स्पर्धेत त्यांनी एकूण आठ सुवर्णपदके पटकावली. तसेच 'बेस्ट लिफ्टर ऑफ इंडिया' अर्थात 'स्ट्रॉंग वुमन ऑफ इंडिया' हा मानाचा किताब त्यांनी सलग नवव्यांदा आपल्या नावावर केला. तेलंगणा, दिल्ली, केरळ, मध्य प्रदेश, मणिपूर, ओडिशा, बिहार, छत्तीसगड, पश्चिम बंगाल आणि कर्नाटकसह विविध राज्यांतील खेळाडूंमध्ये त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली.

# सिग्नेचर ग्लोबलने पहिल्या तिमाहीत ₹५.५ अब्ज महसूल नोंदवला

**प्री-सेल्समध्ये २५% वाढ होऊन ₹१९.७ अब्ज**

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट विकासकांपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने या तिमाहीत ₹५.५ अब्ज महसूल नोंदवला असून ₹६.७ अब्ज कलेक्शन केले आहे.

निवासी प्रकल्पांना सातत्याने मिळत असलेल्या मागणीमुळे चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत कंपनीची प्री-सेल्स तिमाही-दर-तिमाही २५ टक्क्यांनी वाढून ₹१९.७ अब्जांवर पोहोचली. तसेच सरासरी विक्री दर (Average Sales Realisation) वाढून प्रति चौरस फूट ₹१७,०९३ झाला असून, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तो ₹१५,२५० प्रति चौरस फूट होता. 'टोनिनो लॅम्बोर्गिनी रेसिडेन्सेस' प्रकल्पाच्या लॉन्चमुळे ही वाढ झाली आहे.


या तिमाहीत कंपनीने 'टोनिनो लॅम्बोर्गिनी रेसिडेन्सेस' लॉन्च करत प्रीमियम हाऊसिंग पोर्टफोलिओ अधिक मजबूत केला आणि वेगाने वाढणाऱ्या 'ब्रँडेड रेसिडेन्स' विभागात धोरणात्मक प्रवेश केला. प्रसिद्ध इटालियन ब्रँड 'टोनिनो लॅम्बोर्गिनी' यांच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पाद्वारे टोनिनो लॅम्बोर्गिनीने भारतीय रिअल इस्टेट



बाजारात महत्त्वपूर्ण प्रवेश केला आहे. गुरुग्राममधील सेक्टर-७१, सदर्न पेरिफेरल रोड (SPR) येथे सुरू करण्यात आलेल्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, कंपनीच्या प्री-सेल्समध्ये त्याचा मोठा वाटा राहिला आहे. तसेच प्रीमियम घरांच्या वाढत्या मागणीवर लक्ष केंद्रित करण्याच्या सिग्नेचर ग्लोबलच्या धोरणालाही यामुळे बळ मिळाले आहे.

तिमाहीअखेर कंपनीचे निव्वळ कर्ज (नेट डेट) ₹३.९ अब्ज इतके होते. ३० जून २०२६ पर्यंत कंपनीकडे मुदत ठेवींसह ₹२५.२२ अब्ज इतकी रोख व बँक शिल्लक होती. यामुळे कंपनीची मजबूत आर्थिक स्थिती आणि भविष्यातील वाढीसाठी आवश्यक असलेली आर्थिक लवचिकता अधोरेखित होते. कंपनीच्या कामगिरीबाबत भाष्य करताना चेअरमन आणि पूर्णवेळ संचालक प्रदीप कुमार अग्रवाल म्हणाले, "या तिमाहीतील कामगिरी आमच्या व्यवसाय मॉडेलची ताकद आणि शिस्तबद्ध अंमलबजावणीची क्षमता दर्शवते. प्रकल्पांच्या वेळापत्रकामुळे महसुलावर काहीसा परिणाम झाला असला, तरी आमच्या व्यवसायाची मूलभूत ताकद आणि कामाचा वेग कायम मजबूत राहिला आहे. मजबूत प्रकल्प पाइपलाइन आणि बांधकामातील सातत्यपूर्ण प्रगतीमुळे त्याला पाठबळ मिळाले आहे. चांगली बाजारपेठीय मागणी, उत्तम उत्पादन मिश्रण आणि वाढलेला विक्री दर यामुळे प्री-सेल्समध्ये भक्कम वाढ झाली असून, घर खरेदीदारांचा सिग्नेचर ग्लोबलवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. टोनिनो लॅम्बोर्गिनीसोबतच्या भागीदारीमुळे आम्ही ब्रँडेड रेसिडेन्स विभागात प्रवेश केला असून, या प्रकल्पाला मिळालेला प्रतिसाद आमच्या प्रीमियम हाऊसिंग धोरणाची यशस्वी अंमलबजावणी दर्शवतो.

## निलंबित परवान्यानंतरही हॉटेल व्यवसाय सुरू



■ नारायणगाव (दै. संध्या)

पुणे-नाशिक महामार्गावरील आळेफाटा येथील प्रवाशांचे हक्काचे ठिकाण असलेल्या प्रसिद्ध 'फाऊंटन प्युअर व्हेज' हॉटेलवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. हॉटेलच्या मुख्य किचनमध्ये कमालीची अस्वच्छता आढळल्याने प्रशासनाने या हॉटेलचा परवाना तातडीने निलंबित केला आहे. मात्र, या कारवाईनंतरही हॉटेल व्यवस्थापनाने शेजारील दुसऱ्या शाखेतून आपला व्यवसाय सुरूच ठेवल्याने प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ मांडला जात असल्याचे चित्र समोर आले आहे. २२ जुलै रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) अधिकाऱ्यांनी अचानक केलेल्या तपासणीत हॉटेलच्या किचनमध्ये तीव्र अस्वच्छता, खिडक्यांना जाळ्या नसणे, माश्यांचा प्रादुर्भाव आणि अन्न सुरक्षा नियमांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे आढळले.अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे उघड झाल्यानंतर, प्रशासनाने तातडीने पावले उचलत हॉटेलचा परवाना निलंबित करण्याचे आदेश दिले. मुख्य शाखेवर कारवाई झाली असली, तरी व्यवस्थापनाने त्याच्या शेजारीच असलेल्या 'फाऊंटन फूड अँड फन' या शाखेत आपले किचन आणि कर्मचारी हलवले. मुख्य शाखेचे ग्राहक आणि एसटीचे प्रवासी टिकवून ठेवण्यासाठी या दुसऱ्या शाखेतून अन्नपदार्थांची विक्री सुरूच ठेवण्यात आली. गंभीर बाब म्हणजे, मुख्य हॉटेलवर कारवाई झालेली असतानाही एसटी बसेस अजूनही याच हॉटेलच्या आवारात थांबत आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या आरोग्याची काळजी नेमकी कोणाला आहे, असा संतप्त सवाल आता नागरिक आणि प्रवाशांमधून उपस्थित केला जात आहे.

## ७६ हजारांचा लॅपटॉप चोरीला

■ नारायणगाव (दै. संध्या)

प्रवासादरम्यान गाफील राहणे किती महागात पडू शकते, याचा प्रत्यय आणून देणारी एक घटना आळेफाटा येथे घडली आहे. एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या एका तरुणीचा तब्बल ७६ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप अज्ञात चोराने लंपास केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिक जिल्ह्यातील जालखेड येथील रहिवासी असलेल्या सोनाली छब्बू डगळे वय २२ या रविवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास पेठ-पुणे एसटी बसने पुण्याच्या दिशेने निघाल्या होत्या. प्रवास सुरू असताना, दुपारी आळेफाटा परिसरातील 'हॉटेल हेमंत'जवळ बस जेवणासाठी थांबली. यावेळी सोनाली यांनी आपली लॅपटॉप बॅग बसमधील सीटच्या वर असलेल्या रॅक मध्ये ठेवली आणि त्या काही वेळासाठी खाली उतरल्या. मात्र, त्या जेवण करून परत बसमध्ये आल्यानंतर त्यांना रॅकमध्ये ठेवलेली बॅग गायब झाल्याचे दिसून आले. बॅगेत असलेल्या निळ्या रंगाचा 'एचपी' कंपनीचा ७६ हजाराचा लॅपटॉप अज्ञात चोराने चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

## जनता विकास मंडळाच्या अध्यक्षपदी औटी यांची सर्वानुमते निवड

■ नारायणगाव (दै. संध्या)

शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राजुरी ता. जुन्नर येथील 'जनता विकास मंडळ' या संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठीच्या नवीन कार्यकारिणीची निवड नुकतीच बिनविरोध पार पडली आहे. संस्थेच्या अध्यक्षपदाची महत्त्वाची धुरा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब औटी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी समीर सदाशिव औटी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.



या कार्यक्रमात नवनियुक्त अध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, संस्थेला ७२ वर्षांची मोठी आणि गौरवशाली परंपरा लाभली आहे. आगामी काळात गुणवत्तेवर आधारित शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जाईल. सर्व पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि माजी विद्यार्थ्यांच्या सोबतीने संस्थेच्या विकासाची एक नवी दिशा निश्चित केली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच या नवीन कार्यकारिणीत इतर प्रमुख पदांची निवड करण्यात आली आहे त्यामध्ये सचिवपदी प्रदीप डुंबरे, खजिनदारपदी डॉ. बाळकृष्ण घंगाळे आणि सहसचिवपदी जालिंदर औटी. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रामदास सरोदे आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून अभय खोजे यांनी चोख जबाबदारी पार पाडली. या निवडीबद्दल सरपंच प्रिया हाडवळे, उपसरपंच ज्ञानेश्वर शेळके,वल्लभ शेळके, एम. डी. घंगाळे, जयसिंग औटी आणि अशोक औटी यांच्यासह सर्व संचालकांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मनोगत व्यक्त करत अभिनंदन केले. या नवीन आणि खंबीर नेतृत्वामुळे संस्थेच्या विकासाला अधिक गती मिळेल, अशी आशा सर्व ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## जेजुरी नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदी रमेश लेंडे व अभिजीत कुदळे

■ जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी जेजुरी शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रमेश लेंडे व सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुदळे यांची बिनविरोध निवड झाली. जेजुरी नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची सत्ता असून नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे 17, भाजपचे दोन व एक अपक्ष नगरसेवक अशी संख्या आहे. यापूर्वीचे स्वीकृत नगरसेवक समीर मोरे, व प्रशांत लाखे यांचा सदस्य पदाचा कार्यकाळ संपल्याने नवीन सदस्य पदासाठी जेजुरी नगरपरिषदेत गुरुवार दिनांक 6 रोजी नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली. या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते रमेश लेंडे व अभिजीत कुदळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. या दोघांची स्वीकृत नगरसेवक पदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, नगरसेवक कृष्णा कुदळे, योगेश जगताप, शिवाजी जगताप, अस्लम पानसरे, स्वप्नील हरपळे , रोहित खोमणे, नगरसेविका भक्ती कोरपड, पद्मा राऊत, अमिना पानसरे, स्नेहल भालेराव, मेघा उबाळे, नीलम सातभाई, मोनिका घाडगे, मंदा बयास, योगिता दोडके, उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रमेश लेंडे व अभिजीत कुदळे यांच्या निवडी नंतर कार्यकर्त्यांनी भंडारा उधळून व फटाके फोडून जल्लोष केला. व जेजुरी शहरातून मिरवणूक काढण्यात आली.





## क्रांतिदिनी पुण्यात प्रथमच अश्वारूढ तिरंगा यात्रा संचलन

■ दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमीतर्फे आयोजन ; अश्वारोहण खेळातील खेळाडूंचा सहभाग




■ पुणे (दै. संध्या)

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रभक्तीच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी क्रांतिदिनानिमित्त पुण्यात प्रथमच अश्वारूढ तिरंगा यात्रा संचलन आयोजित करण्यात आले आहे. दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमी तर्फे रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता हे अश्वारूढ संचलन शहराच्या मध्य भागात होणार आहे, अशी माहिती अकॅडमीचे अध्यक्ष गुणेश पुरंदरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला विनायक हळबे, नरेंद्र पाटील, जनक टेकाळे, समीर धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

गुणेश पुरंदरे म्हणाले, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेऊन मंदिरापासून या यात्रेला प्रारंभ होणार आहे. बेलबाग चौक, लक्ष्मी रस्ता मार्गे ही यात्रा मार्गस्थ होणार असून टिळक चौक, लकडी पूल आणि छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथे यात्रेचा समारोप होईल. या अश्व संचलनामध्ये १५ प्रशिक्षित घोडेस्वार सहभागी होणार असून यात आठ वर्षापासून ते साठ वर्षांपर्यंतचे अश्वारोहण करणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी असणार आहेत. अश्वावर स्वार होऊन हातात तिरंगा ध्वज घेत अनोख्या पद्धतीने क्रान्तिकारकांना अभिवादन केले जाणार आहे.

अश्वारोहण खेळामध्ये राज्य,राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय काम करणारे खेळाडू सुद्धा यात सहभागी होतील. छत्रपती संभाजी महाराज स्मारक, डेक्कन जिमखाना येथे यात्रेचा समारोप राष्ट्रगीताने होणार आहे. ठिकठिकाणी यात्रेचे स्वागत देखील करण्यात येणार असून विविध गणेशोत्सव मंडळे व संस्थांचे कार्यकर्ते देखील उपस्थित राहणार आहेत.

दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमी मागील पंचवीस वर्षांपासून अश्वारोहण प्रशिक्षण, अश्वारोहण मोहिमा, अश्वारोहण स्पर्धा इत्यादी माध्यमातून या पारंपरिक व आधुनिक ऑलम्पिक क्रीडा प्रकार सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचे कार्य करीत आहे. नुकतीच मे महिन्यामध्ये आपण २५ किल्ल्यांवरून शिवचरित्र प्रसार ही अश्व मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आता हा अनोखा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून सहभागी वीरांना शुभेच्छा देऊन राष्ट्रभक्तीच्या या उपक्रमात पुणेकरांनी सहभाग घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.

# कर्करोगावरील आयुर्वेदाच्या मूलभूत संशोधनाला मान्यता

■ पुणे (दै. संध्या)

कर्करोगावरील आयुर्वेदाच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची मान्यता मिळाली आहे. पुण्यातील रसायु कॅन्सर क्लिनिकच्या संशोधनाची निवड अमेरिकन सोसायटी ऑफ क्लिनिकल ऑन्कोलॉजी (एएससीओ-ॲस्को) आयोजित 'ॲस्को ब्रेकथ्रू २०२६' या जागतिक परिषदेत झाली असून, जर्नल ऑफ क्लिनिकल ऑन्कोलॉजी (जेसीओ) 'इम्पॅक्ट फॅक्टर-४४.७' या प्रतिष्ठित वैद्यकीय नियतकालिकातही त्याचा समावेश करण्यात आला आहे. ऑन्कोलॉजी क्षेत्रातील ३३३ नियतकालिकांपैकी सातव्या क्रमांकावर असलेल्या या प्रतिष्ठित नियतकालिकात संशोधन प्रकाशित होणे ही भारतीय आयुर्वेद संशोधनासाठी महत्त्वाची आंतरराष्ट्रीय मान्यता मानली जात आहे.



रसायु कॅन्सर क्लिनिकचे संस्थापक वैद्य योगेश बेंडाळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या संशोधनात २०२० ते २०२५ या कालावधीत रसायु कॅन्सर क्लिनिकमध्ये उपचारासाठी आलेल्या ३,३५१ कॅन्सर रुग्णांचा अभ्यास करण्यात आला. हा अभ्यास भारतातील कॅन्सर रुग्णांच्या आयुर्वेदाविषयीच्या अपेक्षांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रत्यक्ष प्रमाणावर आधारित अभ्यास मानला जात आहे. 'एक्सपेक्टेशन्स अँड अनमेट नीड्स ऑफ कॅंसर पेशंट्स सीकिंग आयुर्वेद रसायन थेरपी-अ क्रॉस सेक्शनल स्टडी फ्रॉम इंडिया' असा संशोधन प्रबंध सादर करण्यात आला. या संशोधनात भारतातील कॅन्सर रुग्णांच्या नेमक्या काय अपेक्षा असतात हे अभ्यासाने हा महत्वाचा उद्देश होता. या अभ्यासातून भारतातील कॅन्सरचे रुग्ण आयुर्वेदाकडे केवळ केमोथेरपी किंवा रेडिओथेरपीचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी येत नसल्याचे स्पष्ट झाले.

> वैद्य योगेश बेंडाळे म्हणाले, "कर्करोगाचा उपचार म्हणजे केवळ रोगावर मात करणे नव्हे, तर रुग्णाला उत्तम जीवनमान, कमी दुष्परिणाम आणि योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. समावेशक कर्करोग उपचार अधिक प्रभावी करण्यासाठी पुराव्यावर आधारित संशोधन आणि रुग्णप्रशिक्षण ही काळाची गरज आहे. यामुळे रुग्णांना योग्य चिकित्सेची निवड करणे सोयीचे होईल."

अभ्यासानुसार केवळ ३१ टक्के रुग्णांनी दुष्परिणामांचे व्यवस्थापन हे आयुर्वेद स्वीकारण्यामागील प्रमुख कारण सांगितले, तर ५१ टक्के रुग्णांनी उत्तम जीवनमान प्राप्त करण्यासाठी आयुर्वेदाची निवड केली. याशिवाय उत्तम जीवनमान, अधिक काळ चांगले आरोग्य, रोगावर प्रभावी नियंत्रण, मानसिक आधार आणि उपचारप्रवासात विश्वासार्ह मार्गदर्शन मिळावे, या अपेक्षेने रुग्ण आयुर्वेदाचा आधार घेत असल्याचे निष्कर्ष समोर आले. संशोधनात २७ टक्के रुग्णांनी पूर्वीच्या उपचारांबाबत समाधान नसल्यामुळे आयुर्वेदाची निवड केल्याचे, तर ७.५ टक्के रुग्णांनी मुख्य उपचार पूर्ण झाल्यानंतर कॅन्सर पुनः उद्भवू नये याकरिता आयुर्वेदाचा आधार घेतल्याचे आढळले, असे वैद्य योगेश बेंडाळे यांनी नमूद केले.

या संशोधनातील अत्यंत महत्वाची विशेष बाब म्हणजे, प्रत्येक तीन रुग्णांपैकी एका रुग्णाला (म्हणजे सुमारे ३० टक्क्याहून अधिक) स्वतःच्या कर्करोगाच्या अवस्थेची माहिती नव्हती, तर प्रगत अवस्थेतील सुमारे २२ टक्के रुग्णांमध्ये पूर्णपणे बरे होण्याची अवास्तव अपेक्षा असल्याचेही संशोधनातून स्पष्ट झाले. हे निष्कर्ष कॅन्सर रुग्णांना / नातेवाईकांना या आजाराविषयी योग्य वेळी योग्य माहिती देणे तसेच वैद्यकीय तज्ज्ञ आणि रुग्णांमधील संवाद अधिक पारदर्शक व प्रभावी करण्याची तातडीची गरज अधोरेखित करतात.